१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• पुणे, बुधवार २० मे, २०२६ • वर्ष-५, अंक-२४०, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 240 Marathi - Daily - Pune, 20 May, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे

24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

'गरीब नगर'वर चालला बीएमसीचा बुलडोझर!

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### केंद्राचा खत अनुदान खर्च ७० हजार कोटींनी वाढणार

**नवी दिल्ली** - पश्चिम आशियातील भू-राजकीय संकटामुळे खतांच्या वाढत्या आयात खर्चाचा ताण केंद्र सरकारच्या तिजोरीवर पडला आहे. वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात यासाठी १.७१ लाख कोटींची तरतूद आहे. परंतु हा खर्च तब्बल ७० हजार कोटी रुपयांनी वाढून थेट २.४१ लाख कोटी रुपयांवर जाण्याचा अंदाज केंद्राच्या खते विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा यांनी वर्तवला आहे. केंद्राच्या खते विभागाच्या अतिरिक्त सचिव अपर्णा एस. शर्मा या पश्चिम आशियातील घडामोडींवर आयोजित आंतरमंत्रालयीन बैठकीदरम्यान बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, यापुढेही खत अनुदानाचा खर्च नक्कीच वाढेल, परंतु तो किती टक्क्यांनी वाढेल हे मी आत्ताच सांगू शकत नाही. ही वाढ ७० हजार कोटी रुपयांपर्यंत असू शकते. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात खत अनुदानासाठी १.७१ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. २०२६ च्या खरीप हंगामासाठी खतांची उपलब्धता 'समाधानकारक' आहे.

### पुतीन सप्टेंबरमध्ये भारत दौऱ्यावर येणार

**मास्को** - रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यावर्षी सप्टेंबर महिन्यात भारतात येणार



आहेत. पुतिन १२ आणि १३ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या ब्रिक्स परिषदेत सहभागी होतील, अशी माहिती रशियन सरकारने दिली आहे. एका वर्षाच्या आत पुतिन यांचा हा दुसरा भारत दौरा असेल. पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना डिसेंबर २०२५ मध्ये त्यांच्या भारत दौऱ्यादरम्यान ब्रिक्स परिषदेत सहभागी होण्यासाठी अधिकृतपणे निमंत्रण दिले होते. पंतप्रधान मोदीही याच वर्षी रशिया दौऱ्यावर जाणार आहेत.

# चवताळलेल्या धोकादायक कुत्र्यांना मारून टाका

## भटके कुत्रे हटवा! प्राणी मित्रांना चपराक! कोर्टाचा निर्णय



**सर्वोच्च न्यायालयाने आज भटक्या कुत्र्यांबाबत दोन महत्त्वाचे निर्णय दिले. चवताळलेले, रेबीज झालेले, धोकादायक भटके कुत्रे मारून टाका, असा निर्णय आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी असलेल्या भटक्या कुत्र्यांना दूरवर शेल्टर होम मध्ये सोडा असाही निर्णय दिला. प्राणीप्रेमी 'पेटा' संघटनेला ही जबरदस्त चपराक आहे. माणसापेक्षा प्राणी महत्त्वाचा नाही, कुत्रा चावल्याच्या घटना वाढत आहेत याची दखल घेत न्यायालयाने हा निर्णय दिला.**



■ नवी दिल्ली

**न्यायालयाचे** आदेश प्रामाणिकपणे पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही गुन्हेगारी कारवाई करू नये, असेही निकालात स्पष्ट करण्यात आले आहे. शाळा, रुग्णालये, बसस्थानके आणि रेल्वे स्थानक परिसरातून भटके कुत्रे हटवण्याचा आधीचा आपला आदेश कायम ठेवत आहोत, असेही कोर्टाने स्पष्ट केले.

न्या. विक्रम नाथ, न्या. संदीप मेहता आणि न्या. एन. व्ही. अंजारिया यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले की, रेबीजग्रस्त किंवा अत्यंत धोकादायक कुत्र्यांमुळे मानवी जीविताला धोका निर्माण होत असेल तर कायदेशीर मर्यादेत राहून कठोर पावले उचलता येतील, ज्यात दयामरणाचाही समावेश असू शकतो. न्यायालयाने नमूद केले की, एबीसी म्हणजे प्राणी जन्म नियंत्रण नियमांची अंमलबजावणी अनेक ठिकाणी अपुरी आणि विस्कळीत राहिली आहे. त्यामुळे ही समस्या सतत वाढत असून, केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया दिली

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

जाते, असे चित्र निर्माण झाले आहे. देशभरात कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या घटना गंभीर स्वरूप धारण करत आहेत. विशेषतः लहान मुले, वृद्ध नागरिक आणि परदेशी पर्यटक यांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे राज्य सरकारे निष्क्रिय राहू शकत नाहीत.

न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश देत म्हटले की, प्रत्येक जिल्ह्यात किमान एक पूर्णपणे कार्यरत एबीसी केंद्र म्हणजे प्राणी जन्म नियंत्रण केंद्र स्थापन करावे. लोकसंख्येच्या घनतेनुसार एबीसी केंद्रांची संख्या वाढवावी. सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. सार्वजनिक सुरक्षेचा विचार करून इतर सार्वजनिक ठिकाणांवरही हे आदेश लागू करण्याबाबत कारणसिद्ध निर्णय घ्यावा. रेबीज प्रतिबंधक औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने महामार्गांवरील भटक्या जनावरांच्या समस्येवर कालबद्ध उपाययोजना कराव्यात. यासह संबंधित अधिकाऱ्यांना कायदेशीर चौकटीत राहून धोकादायक किंवा रेबीजग्रस्त कुत्र्यांबाबत दयामरणासह आवश्यक उपाययोजना करण्याचा अधिकार असेल. न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी करणाऱ्या पालिका व राज्य प्रशासनातील अधिकाऱ्यांना संरक्षण दिले जाईल. अशा अधिकाऱ्यांविरोधात साधारणपणे एफआयआर किंवा सक्तीची कारवाई केली जाणार नाही.

» पान ७ वर

## पेट्रोल-डिझेलच्या भावात चार दिवसांत पुन्हा वाढ

**देशात पेट्रोल आणि डिझेलचे दर अवघ्या चार दिवसांत पुन्हा एकदा वाढले आहेत. आज पेट्रोलच्या दरात ९१ पैशांनी, तर डिझेलच्या दरात ९४ पैशांनी वाढ झाली आहे. याआधी १५ मे रोजी पेट्रोल, डिझेलच्या किमतीत ३ रुपयांची वाढ केली होती.**




■ मुंबई

**या भाववाढीनंतर** दिल्लीमध्ये पेट्रोलचा दर आता ९८.६४ रुपये तर डिझेलचा दर ९१.५८ रुपये प्रति लीटर झाला आहे. तर मुंबईत पेट्रोल १०७.५९ रुपये प्रति लीटर आणि डिझेल ९४.०८ रुपये प्रति लीटर झाले. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात मोठी चढ-उतार झाली आहे. इराण-अमेरिका संघर्षामुळे क्रूड ऑईलचे दर ७० डॉलर वरून १११ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले आहेत. त्यामुळे भारतीय तेल कंपन्यांवर दबाव आला आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होईपर्यंत सरकारने याबाबतीत निर्णय घेतला नव्हता. पण चार दिवसांपूर्वी सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या भावात पहिल्यांदा तीन रुपयांची वाढ केली. त्यावेळीच पुन्हा भाववाढीची शक्यता वर्तवण्यात आली होती. ती आज खरी ठरली.

इंधन दरवाढीवरून सर्वसामान्यांमध्ये रोष असतानाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. जळगावमधील सर्व पेट्रोल पंप कोरडे पडले आहेत. गडचिरोली जिल्ह्यात गेल्या २ दिवसांपासून डिझेलचा पुरवठा पूर्णपणे बंद आहे. जिथे पेट्रोल-डिझेल आहे, त्या पंपांवर २ ते ४ किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. याचा मोठा फटका वाहतूक व्यवसायाला बसला आहे. वाशिम आणि अकोला येथे तीव्र इंधनटंचाई निर्माण झाली असून, डिझेलसाठी शेतकऱ्यांची झुंबड उडाली आहे. काही ठिकाणी रांगेत नंबर

» पान ७ वर

## पार्थ नंतर तटकरे, मुंडे, भुजबळ फडणवीसांना भेटले! राष्ट्रवादी फुटणार?

■ मुंबई

**राष्ट्रवादी** काँग्रेस अजित पवार गटात गेले काही दिवस नेतृत्वावरून जबरदस्त संघर्ष सुरू असतानाच काल तटकरे, धनंजय मुंडे आणि छगन भुजबळ यांनी स्वतंत्रपणे मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली.




त्याच्या एक दिवस आधी पार्थ पवारही एकटेच फडणवीसांना भेटले होते. वरिष्ठ नेते एकामागोमाग फडणवीसांना भेटत असल्यामुळे राष्ट्रवादीत नेमके काय चालले आहे, याबद्दल तर्कवितर्क लढवले जात आहेत. दुसरीकडे सुनेत्रा पवार यांनी पक्षाचे रणनीतीकार गुलाबी जॅकेट फेम नरेश अरोरा यांना डावलून प्रशांत किशोर यांच्याकडे जबाबदारी सोपवण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे. हा निर्णय घेताना जी बैठक झाली त्या बैठकीलाही तटकरे व प्रफुल्ल पटेल उपस्थित नव्हते. नरेश अरोरा याला काढा, असे अजित पवार सतत सांगत होते तर त्याला ठेवा, असा तटकरे व पटेल यांचा आग्रह होता. इतकेच नव्हे तर अल्पकाळात अरोराने हेलिकॉप्टर विकत घेतल्याने त्याच्या बद्दल संशय होता. अजित पवार यांच्या मृत्यू पासून अरोरा गायब आहे. त्याच्या चौकशीची मागणी होऊनही अद्याप त्याला एकदाही चौकशीला बोलावले नाही.

या सर्व घडामोडींमुळे राष्ट्रवादी दुसऱ्यांदा फुटणार, अशी चर्चा होत » पान ७ वर

## औषध विक्रेते संपावर ठाम माघार घेण्यास स्पष्ट नकार

■ मुंबई

**ऑनलाईन** औषध विक्री, कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिले जाणारे मोठे डिस्काउंट आणि बनावट औषधांच्या वाढत्या धोक्याविरोधात अखिल भारतीय औषध विक्रेते संघटनेने २० मे रोजी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. आज घटना पदाधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागाचे आयुक्त यांच्यासह अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. त्यांनी माघार घ्यायची विनंती केली. परंतु औषध विक्रेत्यांनी माघार घेण्यास स्पष्ट नकार दिला.

औषध विक्रेत्यांनी या संपातून माघार घेतल्याची चर्चा आज सुरू होती. मात्र औषध विक्रेते संपावर ठाम असल्याचे अखिल भारतीय औषध विक्रेते संघटनेचे सचिव अनिल नावंदर यांनी सांगितले. ते म्हणाले की, संघटना पदाधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, विभागाचे आयुक्त यांच्यासह अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. यामध्ये त्यांनी संघटनेला संप माघार घेण्याबाबत सांगितले. मात्र आम्ही कोणाला त्रास देण्याच्या उद्देशाने संप करत नाही. » पान ५ वर

## अशोक खरातच्या अटकेसाठी ईडीला कोर्टाकडून परवानगी

**७० कोटींचे मनीलाँड्रिंग**

■ मुंबई

**लैंगिक** शोषणाच्या आरोपामुळे वादाच्या भोवऱ्यात सापडलेला स्वयंघोषित भोंदू महाराज अशोक खरातला विशेष पीएमएलए न्यायालयाने मंगळवारी मोठा दणका दिला. ७० कोटी रुपयांच्या मनीलाँड्रिंग प्रकरणात खरातला अटक करण्यासाठी न्यायालयाने सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) परवानगी दिली. त्यामुळे ईडीच्या पुढील कारवाई आणि चौकशीचा मार्ग मोकळा झाला असून, अशोक खरातच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे.

अशोक खरातच्या लैंगिक शोषणाच्या कारनाम्यांनी संपूर्ण राज्यभरात खळबळ उडवून दिली. त्यानंतर त्याने केलेल्या अफरातफरीची पोलखोल झाली. खरातने अहिल्यानगरमधील समता नागरी सहकारी पतसंस्थेत एकाच दिवसात तब्बल ६० बेनामी बँक खाती उघडल्याचा आरोप आहे. यासाठी त्याने त्याच्या भक्तांच्या आधार कार्डांचा आणि कागदपत्रांचा त्यांच्या नकळत गैरवापर केला. मध आणि चिंचोक्यांमध्ये 'दैवी शक्ती' असल्याचे सांगून तो या वस्तू भक्तांना अवाजवी किमतीत विकायचा आणि फसवणूक करायचा. खंडणी आणि फसवणुकीच्या माध्यमातून कमावलेल्या पैशातून खरातने स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या नावावर मोठी जंगम आणि स्थावर मालमत्ता गोळा केली आहे. याप्रकरणी ईडीने खरातविरोधात आर्थिक अफरातफरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## वांद्र्याच्या गरीबनगर झोपडपट्टीवर बुलडोझर रेल्वे पूल बंद ठेवल्याने प्रवाशांची कोंडी

■ मुंबई

**पश्चिम** रेल्वेवरील वांद्रे स्थानकाच्या पूर्वेकडील रुळांना लागून असलेली अनधिकृत बांधकामे पाडण्यास आजपासून सुरुवात करण्यात आली. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पुढील काही दिवस ही कारवाई सुरू राहणार आहे. परंतु यासाठी वांद्रे रेल्वे स्थानकावरून येणारा एक रेल्वे फूटओव्हर ब्रिज पूर्व बाजूने बंद ठेवल्यामुळे प्रवाशांना



नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

२०१७ पासून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईनंतर मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीने ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. वांद्रे स्थानक परिसरातील सुमारे ५ हजार चौरस मीटर जागेवर पसरलेल्या» पान ७ वर

## मंत्रिमंडळाचा एकच निर्णय ॲमिटी विद्यापीठाला मोठी जमीन

■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज केवळ एकच निर्णय घेण्यात आला. ॲमिटी विद्यापीठाच्या विस्तारासाठी रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात १५ एकर जमीन अमिटीला देण्यात आली.

ॲमिटी विद्यापीठाची मूळ संस्था असलेल्या रितनंद बलवेद एज्युकेशन फाउंडेशनला रायगड जिल्हा पनवेल तालुक्यातील भाताण गावची १५ एकर जमीन देण्यात आली आहे. ही जमीन विशेष बाब म्हणून वर्ग-२ धारणाधिकाराच्या स्वरूपात उपलब्ध करून दिली जाणार असून, त्यासाठी कब्जे हक्काची रक्कम आकारली जाणार आहे.

सध्या ॲमिटी विद्यापीठामध्ये १८ विविध शाखांमधून शैक्षणिक अभ्यासक्रम राबवले जात आहेत. येथे पाच हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून, वाढत्या शैक्षणिक गरजा आणि नव्या अभ्यासक्रमांच्या विस्तारासाठी अतिरिक्त जागेची मागणी संस्थेकडून करण्यात आली होती. सरकारने मंजूर केलेल्या या जमिनीवर शैक्षणिक संकुल, वसतीगृहे, क्रीडांगणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि इतर शैक्षणिक सुविधा उभारल्या जाणार आहेत. पनवेल तालुक्यातील भाताण येथील विविध सर्वे क्रमांकांतील जमीन या प्रकल्पासाठी देण्यात येणार असल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली.

## रशियन तेलखरेदी निर्बंधावरील स्थगिती अमेरिकेने आणखी एक महिना वाढवली

**मध्य पूर्वेतील युद्धामुळे अमेरिकेने रशियन तेलावरील निर्बंधांना दिलेल्या स्थगितीची मुदत आणखी एक महिन्याने वाढवली आहे. भारतासाठी ही आनंदाची गोष्ट आहे. याआधी दिलेली मुदत १६ मे रोजी संपली आहे. या मुदतीत युद्धावर कोणताही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे जगाचा तेलपुरवठा सुरळीत राहावा, यासाठी अमेरिकेने ही मुदतवाढ दिली आहे.**

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि इस्त्रायलने युद्ध छेडल्याने प्रत्युत्तरादाखल इराणने होर्मुजची सामुद्रधुनी रोखली आहे. तर अमेरिकेनेही होर्मुजची नाकाबंदी केली आहे. होर्मुज सामुद्रधुनीतून जगाच्या एकूण तेलसाठ्याच्या २० टक्के तेलाची वाहतूक होते. होर्मुज रोखल्याने ही वाहतूक खंडित झाली आहे. त्यामुळे अमेरिकेने रशियन तेलावरील निर्बंधांना स्थगिती दिली होती. भारत हा रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणारा मोठा खरेदीदार देश आहे. रशियाकडून भारताला तुलनेने स्वस्तात तेल उपलब्ध होते. मात्र अमेरिकेने निर्बंध घातल्याने भारताला रशियाकडून तेल खरेदी करता येत नव्हते. निर्बंधांवरील स्थगितीची मुदत १६ मे रोजी संपल्यानंतर भारताने



रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवण्याची भूमिका घेतली होती. काल रात्री उशिरा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्थगितीला मुदतवाढ घोषित केली.

## नीट-पीजी पेपरफुटी प्रकरणात मोटेगावकरच्या मुलाची चौकशी

■ पुणे

**नीट-पीजी** पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेला लातूरच्या 'आरसीसी' कोचिंग क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर याचा मुलगा आर्यन याची सीबीआयकडून पुण्यात चौकशी सुरू आहे. स्वतःच्या मुलाला एमबीबीएस प्रवेशासाठी जास्तीत जास्त गुण मिळावेत, यासाठीच मोटेगावकरने पेपर फोडला आणि तो नंतर इतरांना विकला, असा संशय सीबीआयला आहे.

सीबीआयचे पथक पुण्यात शिवराज मोटेगावकरचा मुलगा आर्यन याची कसून चौकशी करत आहे. आज त्याच्यासोबत वकीलही होता. आर्यन यंदा १२ वीत होता आणि त्याने नीट परीक्षा दिली होती. मुलाला डॉक्टर बनवण्यासाठीच मोटेगावकरने इतका मोठा धोका पत्करल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. सीबीआयने लातूर येथील मोटेगावकरच्या घरावर टाकलेल्या छाप्यात रसायनशास्त्र विषयाची नीट परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका हस्तगत केली आहे. » पान ७ वर

## नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव सुप्रीम कोर्टानेही याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**नवी मुंबई** विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने केंद्र सरकारला दिला आहे. मात्र केंद्र सरकारने यावर अद्याप निर्णय घेतलेला नाही. तो निर्णय निश्चित कालावधीत घेण्याचे निर्देश केंद्र सरकारला द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. अशाप्रकारे निर्देश देणे म्हणजे न्यायपालिकेने धोरणकर्त्यांच्या कामात हस्तक्षेप ठरेल, असे निरीक्षण न्यायालयाने याप्रसंगी नोंदवले. ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली होती.

प्रकाशझोत सामाजिक संस्थेने ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल




केली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका फेटाळण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी संस्थेने ही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. ज्यॉयमल्ल्या बागची आणि न्या. विपूल पांचोली यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. त्याप्रसंगी एखाद्या विमानतळाचे नाव काय असावे हे ठरवणे न्यायालयाचे काम आहे का, असा सवाल याचिकाकर्त्याच्या वकिलांना केला.

तसेच याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार ज्यांना आहेत त्यांच्याकडे पाठपुरावा करा, असा सल्ला खंडपीठाने याचिकाकर्त्याला दिला.

# किराणा महागला...

**सायंकाळी घरातील किराणा खरेदीला गेलो, सर्व किराण्याचा किती पैसे झाले म्हणलो. दुकानदार म्हणाले ९१५ रुपये झाले. पैसे जास्त झाल्यासारखे वाटले म्हणून पुन्हा म्हणालो, किती? पुन्हा दुकानदार म्हणाले, ९१५ झाले. पैसे जास्त झाल्याची मला शंका आली. म्हणून प्रत्येक वस्तुचे दर विचारू लागलो. त्यात शेंगदाणे १८० रुपये किलो असे दुकानदारांनी सांगितले.**

मी म्हणालो, थांबा. शेंगदाणे १३० रुपये किलोने गेल्यावेळी घेतले. आता एवढे पैसे कसे?

दुकानदार म्हणाले शेंगदाण्याचे भाव वाढले, किलोमागे ५० रुपये लगेच दोन प्रकाराचे दाखवले. खराब आणि बारके १६०, तर चांगले १८० रुपये किलो होते.

मला शॉक बसला. कारण १ महिन्यापूर्वी १३० रुपये किलोने मिळणारे शेंगदाणे १८० रुपये किलो झाले. जवळजवळ किलोमागे ५० रुपयांची वाढ झालेली पाहण्यास मिळाली. ४१ टक्के वाढ एका दोन महिन्यात होणे, माझ्यासाठी शॉकिंग आहे. दुसरे, भुईमूग आणि आखाती देशातील युद्ध यांचा काहीच संबंध नाही हे देखील समजून घ्यावे लागेल.

किराणा माल घेऊन घरी आलो, पण ही भाववाढ झालेली मनाला शांत बसू देईना. माझ्या डोळ्यासमोर गरीब कुटुंबाचे खाणे आणि अर्थकारण उभा राहू लागलं.

एवढेच नाही महागाई देखील संथगतीने वाढतेय हे देखील समजून घ्यावं लागेल. पण वेळ कोणाकडे आहे. धर्म आणि जात यात आपला (नागरिकांचा) जीव अडकला आहे. आर्थिक आणि जगण्याच्या प्रश्नांमध्ये काही घेऊन बसला आहात, असेही म्हणेल मध्यमवर्गीय एखादा. असो.

मनात म्हणालो, गरिबाचा बदाम म्हणून ज्याची ओळख होती, तेच एवढ्या प्रचंड वेगाने महाग होत असेल तर गरीब पौष्टिक आहार खाण्यापासून वंचित होतील. त्यांच्या आहारातून कुपोषण येणे सुरू होणार आहे. हे राष्ट्रीय मानवी हेल्थसाठी धोक्याचे आहे. त्याचवेळी आठवत होतं की, जवळजवळ ८५ कोटी लोकसंख्या ही



रेशनच्या मालावर अवलंबून आहे. हेच लोक गरीब वर्गवारीत होतात. यातील किती कुटुंबे हे शेंगदाणे खाऊ शकतील? तर ही संख्या कमी असेल हे सांगण्याची गरज नाही.

मध्यमवर्गीय कुटुंबाचे किती भाज्या ह्या शेंगदाणे टाकल्याशिवाय पूर्ण होत नाहीत, हा विचार करावा लागेल. कारण शेंगदाण्याच्या किमती वाढल्या तरीही मध्यमवर्ग खरेदी करून खाऊ शकेल. या संदर्भातील एक उदाहरण आठवलं.

त्याचं झालं असं की, पाच महिन्यापूर्वी एका पुणेरी उच्च मध्यम वर्गातील एका व्यक्तीशी बोलताना म्हणालो, खाद्यतेलांच्या किमती वाढू लागल्या आहेत तर त्यावर तो व्यक्ती म्हणाला किती वाढल्या आहेत?

मी म्हणालो, जवळजवळ ५० रुपयांनी वाढल्या आहेत. त्यावर तो व्यक्ती म्हणाला, मला काय फरक पडतोय, माझ्यासाठी ५० रुपये खूप जास्त नाही. १५० ऐवजी मी २०० रुपये देऊ शकतो. पण हेच गरिबाच्या बाबतीत घडत नाही. त्यांच्यासाठी ४/५ टक्के वाढ झाली तरीही कुटुंबाच्या आर्थिक घटकांवर परिणाम करणारे आहे. त्यात गरिबांसाठी ५० रुपये ही मोठी रक्कम असते. असो.

डॉक्टर सांगतात की, सतत खाद्यतेल बदला. वेगवेगळे खाद्यतेल खाण्यात आणा. पण अशा जर शेंगदाण्याच्या किमती वाढल्या तर तेलाच्या देखील किमती वाढणार? अर्थात शेंगदाणे खाद्यतेल देखील आहारातून गायब होणार !!!.

शेंगदाणे सारखे पदार्थ भाववाढीच्या कारणाने आहारातून गायब होण्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अंगमेहनत करणाऱ्या वर्गाला सक्षम आहार मिळाला तर क्षमतेने माल करू शकणार आहे. मात्र तोच आहार गायब करणे धोक्याचे आहे.

शेंगदाणे (भुईमूग) उत्पादन कमी होत असेल तर धोरणात्मक निर्णय घेऊन वाढवायला हवे. पण तसे केले नाहीतर हे सरकारचे अपयश आहे. दुसरीकडे सरकार नागरिकांच्या आहाराकडे दुर्लक्ष देखील करत आहे हे नाकारता येत नाही.

आठवून पाहा. जून दिवस!!!

काही वर्षांपूर्वी अनेक खेडेगावांमध्ये शेतकऱ्यांकडून गावरान भुईमुगाचे (पसाऱ्या भुईमुगाचे) उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतला जात होते. गावरान वाण असल्याने अगदी खोबरे-बदामप्रमाणे चव लागत होते. (गरिबाचे बदाम म्हणून त्यास ओळख होती). ते शेतकऱ्यांच्या पहिल्या पसंतीचे होते. पाणी गायब झाले आणि भुईमुगाचा वाणही गायब झाला तो कायमचा.

अलीकडे अनेक संकरित वाण आले आहेत, पण गावरान वाणाप्रमाणे थोडीही चव लागत नाही. सांगण्याचे तात्पर्य असे की, पाणी गायब झाल्यामुळे हळूहळू अनेक गावरान पिके देखील गायब होऊ लागली आहेत. ही पिके गायब होणे शेतकऱ्यांची खूप मोठी हानी होणारे आहे.

**- सोमिनाथ घोळवे**

# चेंबूरचा जलतरण तलाव ऐन उन्हाळ्यात बंद स्थितीत

**हजारो वार्षिक सभासदांची गैरसोय**

■ मुंबई

**चेंबूर** येथील एम पश्चिम विभाग कार्यालयाजवळ असलेला जनरल अरुणकुमार वैद्य जलतरण तलाव गेल्या महिनाभरापासून बंद स्थितीत आहे. ऐन उन्हाळ्यात हा जलतरण तलाव गळतीच्या कारणावरून बंद ठेवला असला तरी महिना उलटला तरी याबाबत कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे १२ हजार रुपये वार्षिक सभासद शुल्क दिलेल्या विद्यार्थ्यांसह शेकडो नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. तरी पालिकेने तत्काळ याबाबत कार्यवाही करून हा तलाव लवकरात लवकर सुरू करावा, अशी मागणी माहिती अधिकार कार्यकर्ते अनिल गलगली यांनी केली आहे.

सध्या उन्हाळी सुट्टी असल्याने शहरातील पालिकेच्या विविध ठिकाणच्या जलतरण तलावांमध्ये लहान मुले, पालक मोठ्या संख्येने येत आहेत. परंतु तब्बल ३१७१ सभासद असलेला



चेंबूरचा हा जलतरण तलाव गळतीच्या नावाखाली बंद ठेवण्यात आला आहे. हा तलाव कधी सुरू होईल हेही अधिकारी सांगत नाहीत. तलावाचे काम पूर्ण होईपर्यंत सभासदांनी अन्य ठिकाणांच्या जलतरण तलावांत जावे, असेही अधिकाऱ्यांकडून सांगितले जात आहे. परंतु दुसऱ्या तलावांत जाणे हे आम्हाला परवडणारे नसून आम्हाला चेंबूरचाच जलतरण तलाव सोयीचा वाटतो, असे मत अनेक सभासद व्यक्त करीत आहेत. त्यामुळे ही सदस्यांची गैरसोय टाळण्यासाठी हा जलतरण तलाव लवकरात लवकर सुरू करणे योग्य ठरेल, असे मत अनिल गलगली यांनी व्यक्त केले आहे.

# बांगलादेशात रेड्यांची नावे ट्रम्प व बेंजामिन नेतान्याहू



■ ढाका

**बांगलादेशमध्ये** सध्या ईद सणाची जोरदार लगबग सुरू आहे. त्यातच देशाच्या या राजधानी शहराजवळच्या भागातील दोन रेडे सोशल मीडियावर चर्चेचा मुख्य विषय बनले आहेत. या रेड्यांची स्वभाव आणि त्यांचा शारीरिक आकार आणि रंगरूप ही वैशिष्ट्ये खास ठरली आहेत. या दोन्ही रेड्यांची तुलना जगातील दोन प्रमुख नेत्यांशी करत आहेत. या रेड्यांना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांची नावे देण्यात आली आहेत.

या रेड्यांना ढाक्याजवळील एका फार्ममध्ये ठेवण्यात आले आहे. त्या ठिकाणी त्यांची झलक पाहण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होत आहे. लोक या रेड्यांसोबत फोटो आणि सेल्फी काढत आहेत. या रेड्यांचे व्हिडिओ व फोटो सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहेत. डोनाल्ड ट्रम्प असे नाव असलेल्या रेड्याचे वजन अंदाजे ७०० किलो आहे. त्याची कातडी फिकट रंगाची असून अंगावर सोनेरी केस आहेत. याच शारीरिक वैशिष्ट्यांमुळे लोकांनी त्याची तुलना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी केली आहे. हा प्राणी शारीरिकदृष्ट्या ट्रम्प यांच्यासारखा दिसत असला, तरी या 'अल्बिनो' पांढऱ्या रंगाच्या रेड्याचा स्वभाव साधारणपणे शांत असतो, पण जर त्यांना मुद्दामहून चिथावले तर ते आक्रमक होतात, अशी माहिती आहे. या रेड्याची विक्री यापूर्वीच करण्यात आली आहे. बेंजामिन नेतान्याहू असे नाव असलेल्या दुसऱ्या रेड्याचे वजन ७५० किलो आहे.

# पुसली धरणात बुडून ३ सख्ख्या भावंडांचा मृत्यू



■ अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील पुसली धरणात बुडून तीन सख्ख्या भावंडांचा मृत्यू झाला. काल दुपारपासून बेपत्ता असलेल्या या तिघांचे मृतदेह आज दुपारी धरणात आढळून आले.

पंकज संतुलाल उईके (१०), प्रिया संतुलाल उईके (८) आणि पवन संतुलाल उईके (७) अशी मृत मुलांची नावे आहेत. ही तिन्ही मुले नरखेड येथील आश्रमशाळेत शिक्षण घेत होती. सध्या सुट्ट्यांमुळे ते आपल्या गावी आई-वडिलांकडे आले होते. काल दुपारी ही तिन्ही मुले घराबाहेर पडली होती. मात्र सायंकाळपर्यंत परत न आल्याने त्यांच्या पालकांनी गावकऱ्यांच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली. रात्रभर शोध सुरू ठेवण्यात आला. आज सकाळपासून शेतशिवार आणि पुसली धरण परिसरात शोध घेण्यात आला. दुपारी सुमारे २ वाजता धरणाच्या काठावर त्यांचे कपडे आढळून आले. धरणात शोध घेतला असता तिन्ही भावंडांचे मृतदेह पाण्यात तरंगताना आढळले. अंघोळीसाठी धरणात उतरल्यावर पाण्याचा अंदाज न आल्याने एकमेकांना वाचवण्याच्या प्रयत्नात तिघेही बुडाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# मुरुडचा जंजिरा किल्ला २६ मेपासून ३ महिने बंद

■ मुरुड

**रायगड** जिल्ह्यातील राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला येत्या मंगळवार २६ मे पासून तीन महिन्यांसाठी पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात येणार आहे. पावसाळ्यात समुद्रात वाढणाऱ्या वादळी वाऱ्यांमुळे आणि उंच लाटांमुळे पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मेरीटाईम बोर्डाने हा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यानंतर सप्टेंबर महिन्यात किल्ला पुन्हा पर्यटकांसाठी खुला होणार आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर समुद्र खवळलेला असल्याने किल्ल्यावर जाणाऱ्या शिडाच्या बोटी मोठ्या प्रमाणात हेलकावे घेत आहेत. त्यामुळे किल्ल्यावर उतरणे धोकादायक ठरत असल्याचे चित्र आहे. यामुळेच प्रशासनाने किल्ला तात्पुरता बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या बंदीमुळे शिडाच्या बोटी चालवणाऱ्या स्थानिकांना मोठा फटका बसणार आहे.

# पंढरपुरात व्हीआयपी दर्शनासाठी भाजपा कार्यकर्त्यांकडून धक्काबुक्की

■ पंढरपूर

**मे** महिन्याच्या सुट्ट्या आणि अधिक मासानिमित्त देशभरातून भाविकांची मोठी गर्दी होत असताना पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात व्हीआयपी दर्शनावरून भाजपा कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. खासदार धनंजय महाडिक यांचे पुत्र व भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णाराज महाडिक यांच्या दौऱ्यावेळी हा प्रकार घडला. महाडिक यांच्यासोबत काही मोजक्या व्यक्तींनाच व्हीआयपी प्रवेश देण्यात आला होता. मात्र त्यांच्यासोबत आलेल्या शेकडो कार्यकर्त्यांनीही त्याच मार्गाने मंदिरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. यामुळे गेटवर धक्काबुक्की झाल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सध्या अधिक मासानिमित्त पंढरपुरात भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे.

# बुलडाण्यात दोन पिस्तुलसह ९२ जिवंत काडतुसे जप्त

■ बुलडाणा

**बुलडाण्यातील** रायपूर पोलीस स्टेशन हद्दीतील अंत्रीकोळी गावात नागपूर आणि अकोला दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) संयुक्त मोठी कारवाई करत दोन संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्या चौकशीतून दोन पिस्तुले आणि तब्बल ९२ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली असून, या घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

अकोला आणि नागपूर एटीएसला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. या संपूर्ण कारवाईबाबत बुलडाणा पोलिसांना पूर्वकल्पना नव्हती, अशी माहिती आहे. अटक करण्यात आलेले दोघे काळ्या रंगाच्या कारमधून या परिसरात फिरत असल्याची माहिती अकोला आणि नागपूर एटीएसला मिळाली होती. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली व दोन पिस्तुल व ९२ जिवंत काडतूसे जप्त केले.

# दोन हत्तींच्या झुंजीमध्ये महिला पर्यटकाचा मृत्यू



■ बंगळुरू

**कर्नाटकातील** कोडगू जिल्ह्यातील प्रसिद्ध 'दुबारे हत्ती शिबिरा' मध्ये एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. दोन हत्तींमध्ये झालेल्या झुंजीत तामिळनाडूतील ३३ वर्षीय महिला पर्यटकाचा जागीच मृत्यू झाला.

'कंचन' आणि 'मार्तंड' या दोन हत्तींना नदीकाठी स्नान घातले जात होते. त्याचवेळी अचानक दोन्ही हत्ती आक्रमक झाले आणि त्यांच्यात जोरदार झुंज सुरू झाली.

महावतांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, हत्ती अधिकच आक्रमक झाल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली. यावेळी 'कंचन' या हत्तीने 'मार्तंड'वर हल्ला केल्यानंतर निर्माण झालेल्या चेंगराचेंगरीत एक महिला अडकली आणि हत्तींच्या पायाखाली चिरडली गेली. या भीषण अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हिडिओमध्ये हत्तींची भीषण झुंज दिसत असून, मृत महिलेचा पती आपल्या लहान मुलाला कडेवर घेऊन पत्नीला वाचवण्यासाठी धडपड करताना दिसतो. या प्रसंगामुळे शिबिरात उपस्थित पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

# शासनाच्या उपजिल्हा अधिकारी कार्यालयाचे जागेसाठी म्हाडाला साकडे

■ मुंबई

**शासनाच्या** गोरेगाव उपजिल्हा अधिकारी कार्यालयाने कामकाजासाठी भाडेतत्त्वावर मालाड परिसरात कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, असे साकडे म्हाडा प्राधिकरणाला घातले आहे.





गोरेगाव (पश्चिम) एस. व्ही. रोड येथे म्हाडाच्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर उपजिल्हा अधिकारी तथा अतिक्रमण निष्कासन विभागाचे कार्यालय गेले अनेक वर्षांपासून होते. मात्र या इमारतीचा पुनर्विकास होणार असल्याने ती रिकामी करून पाडण्यात आली आहे. यामध्ये असलेल्या उपजिल्हा अधिकारी कार्यालयाला आपला गाशा गुंडाळावा लागला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून कार्यालयाअभावी कामकाजावर परिणाम झाल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

म्हाडाच्या इमारतीत आमचे कार्यालय असल्याने आम्ही म्हाडाकडे मालाड मालवणी येथे पर्यायी भाडेतत्त्वावर कार्यालयासाठी जागेची मागणी गेल्या काही महिन्यांपूर्वी केलेली आहे. परंतु अद्याप जागा मिळू शकली नाही, अशी खंत कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. या संदर्भात म्हाडा मुंबई मंडळ कार्यालयाकडे विचारणा केली असता, असे सांगण्यात आले की, आम्ही त्यांच्या मागणीचा नक्कीच विचार केलेला आहे. सरकारी कार्यालयाच्या जागेसाठी त्यांना जागा हवी असल्याने लवकर दिली जाणार आहे.

# नागपूर विद्यापीठाविरोधात भाजपा युवा मोर्चाचे आंदोलन

■ नागपूर

**राष्ट्रसंत** तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कारभाराविरोधात भाजपा युवा मोर्चाने आज जोरदार आंदोलन केले. विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात होत असलेला विलंब, परीक्षा व्यवस्थेतील गोंधळ आणि विद्यापीठ प्रशासनाच्या कथित निष्काळजीपणाविरोधात आंदोलन करण्यात आले. प्रशासनाच्या अनास्थेमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. यावेळी कुलगुरू कार्यालयाबाहेर घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. आंदोलनादरम्यान एका संतप्त कार्यकर्त्याने परिसरातील कुंड्यांची तोडफोड केल्याने एकच खळबळ उडाली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त तैनात होता. परिस्थिती नियंत्रणात आणत संबंधित कार्यकर्त्यासह काही आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले.

**PUBLIC NOTICE**

**Mumbai EOW Charge Sheet against Ranjit Darak and Other for Creating Fraudulent Third-Party Rights in Pune Land Deal Through Criminal Conspiracy, Cheating, Forgery and If Convicted They May Face Imprisonment Of up to 7 Years**

The Economic Offences Wing (EOW) of Mumbai Police has filed a detailed charge sheet before the Additional Chief Metropolitan Magistrate, Mumbai, pursuant to FIR registered as EOW C.R. No. 23/2026, naming Pune based Ranjit Ashok Darak among seven accused in an alleged multi-crore real estate fraud involving development rights over land in Vimannagar, Pune. The case arises from a complaint filed by Mr. Subodh Runwal, stating that Ranjit Darak, along with his partner Nitin Chavan in their partnership firm M/s Bridgewater Realty LLP and in collusion with Nitin Mittal, Ashish Mittal, Kavita Agarwal and Meenadevi Mittal conspired a scheme to create fraudulent third-party rights over a valuable development project through forged documents, causing substantial wrongful loss to the complainant's group entities.

According to the charge sheet, the Runwal group had development rights over the Pune land well established through development agreements and joint venture arrangements. The charge sheet states that in spite of the well-established existing rights of Runwal group, Darak, acting through and with Bridgewater Realty LLP, engineered a series of subsequent fraudulent forged instruments to carve out substantial interests for Bridgewater in the land and to seize control of the project to the detriment of Runwal group's entitlements.

As per the prosecution, the creation of so-called "Third Party Rights" by Darak in his partnership firm's favour is an aggressive intrusion for land grabbing. The charge sheet casts Darak as the mastermind behind the effort to oust Runwal's interests from the Pune land development.

The charge sheet also mentions the financial arrangement that took place between Darak and the other accused running to about ₹17 crore noting that these large figures are a part of a deliberate strategy by Darak and other accused to establish an illegitimate foothold in the project and to secure economic control over rights in the land that were already validly with the Runwal group.

The investigators further rely on a voluminous set of supporting documents to establish that Runwal's rights were firmly crystallized much before the fraudulent transactions were undertaken by Darak in favour of Bridgewater.

The EOW, Mumbai has registered crime against Darak and other under sections 318(4) (cheating), 61(2) (criminal conspiracy), section 3(5) (common intention), 335 (making false documents) of the Bhartiya Nyaya Sanhita, 2023. The charge sheet characterises the accused's conduct as part of a calculated plan to secure wrongful gain at the expense of and to the detriment of Runwal group's legally documented rights in the Pune land parcel. If convicted, Ranjit Darak and other accused may face imprisonment of up to 7 years.

**Date: 19.05.2026**
**Place: Mumbai**

**Sd/-**
**Runwal Enterprises Ltd.**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# पेपरफुटीचा लातूर पॅटर्न

वैद्यकीय क्षेत्रातली गुणवत्ता टिकून राहावी म्हणजे वैद्यकीय शिक्षणासाठी आवश्यक असलेली पात्रता सिद्ध व्हावी आणि समाजाला चांगले डॉक्टर्स वैद्य मिळावे, या हेतूने देशपातळीवर राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट ही परीक्षा पद्धती राबवली जाते. ज्या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते त्या उद्देशालाच काळीमा फासणाऱ्या पेपरफुटीच्या घटना सलग तीन वर्षांपासून घडत आहेत. यावर्षीच्या पेपर फुटीतून जी काही माहिती समोर येते आहे ती पाहिल्यानंतर खाजगी क्लासेस आणि पेपर तयार करणारे प्राध्यापक आणि जिथून त्याची छपाई होते आणि लाखोंनी त्याची विक्री करणारे हस्तक अशा या चांडाळचौकडीने नीट परीक्षेचे पूर्ण तीन-तेरा वाजवले यातला धक्कादायक भाग असा आहे की, महाराष्ट्रातले जवळपास तिघेजण त्यामध्ये अडकले आहेत. यात एक प्राध्यापिका मनिषा मांढरे यांचा समावेश अधिकच धक्कादायक ठरतो. नाशिकमधल्या शुभम खैरनारला झालेली अटक आणि व्हाया नाशिक लातूरपर्यंत येऊन पोहचलेले पेपर फुटीचे धागेदोरे म्हणजे पेपर फुटीचा लातूर पॅटर्नच स्पष्ट करणारा आहे. तिथल्या आरसीसी कोचिंग क्लासचा शिवराज मोटेगावकर याला झालेली अटक म्हणजे खाजगी क्लासेसने नीट परीक्षांसाठी सुरू केलेली उघड उघड दुकानदारी ठरते. हा मोटेगावकर आपल्या क्लासची जाहिरात करताना डॉक्टर, इंजिनिअर बनवण्याची फॅक्टरी असेच शब्द वापरत होता. केवळ दहा वर्षांमध्ये कोट्यवधी रुपये कमावण्याची किमया या मोटेगावकरला साधली. म्हणजे त्याच्या या कमाईचे गुपित अशाच पेपर फुटीमध्ये दडलेले होते. हेही स्पष्ट होते. हे पेपरफुटीप्रकरण आता सीबीआयकडे सुपूर्त केलेले आहे. हरियाणा, युपी, मध्यप्रदेश, राजस्थान इथून काही लोकांना अटक झालेली आहे. म्हणजे चांगले डॉक्टर्स तयार होण्यासाठी पेपरफुटीचा भेसळयुक्त औषधांचा उपचार या समाजकंटकांनी केलेला आहे. त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे यात काही शंका नाही. परंतु आपली न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणा या सगळ्यांचा विचार केला तर फार मोठी शिक्षा होईल असे समजायचे कारण नाही.

### पेपरफुटीची फॅक्टरी

या तीनही लोकांना झालेली अटक महाराष्ट्रासाठी सर्वाधिक लाजिरवाणी ठरते. पंचवीस वर्षांपूर्वी दहावी परीक्षेचा उत्तम गुण मिळवण्याचा पॅटर्न याच लातूर शहराने प्रस्थापित केला होता. विद्यार्थ्यांची तयारी कशी करून घ्यायची. प्रश्नपत्रिकांचा अभ्यास करून उत्तरपत्रिका लिहिण्याची वेगळी पद्धतही लातूर शहरातल्या शाळांनी राबवली होती. त्याचा उपयोग असा झाला की, सलग पाच-सहा वर्षे संपूर्ण राज्यात लातूर विभागाचा निकाल सर्वाधिक लागत होता. राज्यातील अनेक शाळांमधून हा लातूर पॅटर्न राबवून आपापल्या शाळांची गुणवत्ताही वाढवली होती. परंतु आता गेल्या काही वर्षात लातूर विभागाचा निकाल पूर्वपदावर आलेला आहे आणि आता तर नीट परीक्षांच्याबाबतीत मोटेगावकर याने लातूर म्हणजे पेपरफुटीची फॅक्टरी असेच त्याचे स्वरूप करून टाकले. जवळपास दहा दिवस आधी नीट परीक्षांची प्रश्नपत्रिका या पेपरफुटी फॅक्टरीवाल्यांच्या हाती लागली होती. ज्या अर्थी तब्बल दहा-दहा दिवस आधी प्रश्नपत्रिका हाती लागत असते. तर यासाठी काम करणारे नेटवर्क किती प्रस्थापित स्वरूपाचे असेल याची कल्पना येत नाही. सलग तीन वर्ष पेपर फुटणे हा भाग तर आहेच. परंतु त्यासाठीचे नेटवर्क गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असले पाहिजे आणि दहा दिवस आधी प्रश्नपत्रिका मिळतही असल्या पाहिजेत. त्याची विक्री करून कोट्यवधी रुपये कमावले गेले असतील यात काही शंका राहात नाही. नीट परीक्षांच्या पेपरफुटीचा हा धीटपणा केवळ लाखो रुपयांच्या कमाईतूनच घडत गेला आणि पैशाच्या जोरावर आपण अनेकांची तोंडे बंद करू शकतो, अशी मस्तीदेखील अंगामध्ये भिनली पाहिजे. महाराष्ट्रातली ही तीन धेंडं तीन चार वर्षांपासून असाच धुमाकूळ घालत असली पाहिजेत. अगदी नाशिकमधल्या शुभम खैरनारने दहा लाख रकमेत घेतली आणि पंधरा लाखाला विकली असेल तर तो या सगळ्यात किती सराईत झाला असेल याचेदेखील अंदाज येतात.

### क्लासेसचे वाढलेले प्रस्थ

चांगले डॉक्टर्स, घडणे किंवा घडवणे हे किती जिकीरीचे काम झाले आहे आणि त्याची सुरूवात नीटच्या पेपर फुटीपासूनच कशी होते हे ठळकपणाने लक्षात येते. सगळाच पैशांचा खेळ असल्याने परीक्षांसाठी मोजावे लागणारे पैसे आणि नंतर वैद्यकीय क्षेत्रामध्ये रुग्णांची केली जाणारी लूट या एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरतात. महाराष्ट्र सरकारच्या शिक्षण विभागाला तर या गोष्टीचा थांगपत्ताही नव्हता. कदाचित त्यांच्या संमतीनेसुद्धा हा सगळा व्यवहार सुरळीतपणे चालत असला पाहिजे. ज्या ज्या गोष्टी समाजविघातक आहेत किंवा एकूणच समाज व्यवस्थेला कायदा सुव्यवस्थेला नख लावणारे आहेत. त्याच्यावर नजर ठेवण्याचे काम राज्याच्या गुप्तचर यंत्रणा करत असतात. केवळ गुन्हेगारी दहशतवादी कारवायाच शोधणे एवढेच त्यांचे काम राहिलेले नाही. अशोक खरातपासून ते मोटेगावकरांपर्यंत अनेक समाजकंटक याच समाजव्यवस्थेला आणि कायदा व्यवस्थेला धक्का पोहचवत असतात. मात्र त्याची माहिती गुप्तचर यंत्रणांपर्यंत पोहचू नये किंवा पोहचली तरी सोयिस्करपणे कानाडोळा करण्याचा प्रकार तितकाच गंभीर ठरतो. या चांडाळचौकटीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचीही झाडाझडती घेतली गेली पाहिजे. विकसित महाराष्ट्राचे ढोल बडवत असताना या गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सध्या खाजगी क्लासेसचे प्रस्थ माजले आहे. शाळांपेक्षाही क्लासेस अधिक महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात. शाळांचे आणि क्लासेसचे टायअप असते. म्हणजे अभ्यास करून घेण्याची जबाबदारी क्लासेसवरच टाकली जाते. त्यासाठी पालकांना क्लासेसची लाखो रुपये फी मोजावी लागते. शाळा मात्र सहिसलामत राहातात.

---

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

अंगावर ब्रँडेड कपडे घालून फिरण्यापेक्षा
मनामध्ये ब्रँडेड विचार घेऊन फिरा,
हे जग तुम्हाला सलाम करेल.

## पंचांग

**बुधवार, २० मे २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**

* **अधिक ज्येष्ठ शुक्ल चतुर्थी**
* **नक्षत्र : आर्द्रा/पुनर्वसू**

**रवी उदय- ०६-०४**
**रवी अस्त- १९-०७**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २२-३९ मिथुन**
**२२-४० ते २४-०० कर्क**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### खिमा नान




★ **साहित्य :** कणकेसाठी: २ कप मैदा, १ चमचा मीठ, १ चमचा साखर, १ कप दही, ५-६ मोठे चमचे तेल, आवश्यकतेनुसार पाणी. खिम्यासाठी: १ कप मटणाचा खिमा, १/२ कप चिरलेला कांदा, १ मोठा चमचा आले-लसूण पेस्ट, १ चमचा लाल मिरची पूड, १/२ चमचा हळद, १/२ चमचा जिरे पूड, १/२ चमचा धणे पूड, १/२ चमचा गरम मसाला, कोथिंबीर.

★ **कृती :** एका भांड्यात मैदा, मीठ, साखर, थोडे तेल, दही आणि पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. पिठाला थोडे तेल लावून सुमारे २ तास मुरू द्या. एका कढईत थोडे तेल गरम करा; आले-लसूण पेस्ट, बारीक केलेला खिमा आणि कांदे घाला. थोडा वेळ शिजल्यावर त्यात जिरेपूड, धणेपूड, गरम मसाला, हळद, लाल तिखट आणि चवीनुसार मीठ घाला. खिमा जवळजवळ शिजल्यावर त्यात कोथिंबीर घाला आणि गॅस बंद करा. कणकेचे गोळे करून त्याचे ४ भाग करा.

जाडसर मध्यम आकाराच्या पोळ्या बनवा आणि त्यात सारण भरा. सर्व बाजू एकत्र दाबून हलक्या हाताने बेक करण्यासाठी लाटा. पॅनवर ५०% शिजवा आणि नंतर आधीच गरम केलेल्या ओव्हनमध्ये तव्यावर शिजवण्यासाठी ठेवा. दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत आणि शिजेपर्यंत हलकेच पलटा. कोथिंबीर आणि लसूण बटर लावा आणि दह्याबरोबर किंवा आवडत्या चटणीबरोबर खायला तयार.

---




# प्लेऑफसाठी आज केकेआरची निर्णायक लढत
## ईडन गार्डन्सवर एमआयसोबत महामुकाबला

**आयपीएलमधील ६५ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात उद्या कोलकात्यातील ईडन गार्डन मैदानावर हायव्होल्टेज लढत रंगणार आहे. प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी केकेआरसाठी हा सामना महत्त्वाचा ठरणार आहे, तर मुंबई इंडियन्स प्रतिष्ठा वाचवण्यासाठी मैदानात उतरणार आहे.**



■ कोलकाता

**कोलकाता** नाईट रायडर्सने या हंगामाची सुरुवात अत्यंत निराशाजनक केली होती. सलग पराभव, गोलंदाजांची खराब कामगिरी आणि संघातील अस्थिरता यामुळे केकेआरची मोहीम सुरुवातीलाच अडचणीत आली होती. मात्र नंतर संघाने शानदार पुनरागमन करत पुन्हा प्लेऑफच्या आशा निर्माण केल्या. मागील सहा सामन्यांपैकी पाच सामने जिंकून त्यांनी जोरदार कमबॅक केले आहे. अजूनही संघ गुणतालिकेत खालच्या स्थानावर असला तरी मुंबईविरुद्ध विजय मिळाल्यास त्यांचे समीकरण पुन्हा जुळू शकते.

केकेआर संघाच्या पुनरागमनामध्ये अजिंक्य राहणे याचे नेतृत्व महत्त्वाचे ठरले. अनुभवी फलंदाज म्हणून त्याने संघाला स्थैर्य दिले. संघाची गोलंदाजी अजूनही चिंतेचा विषय आहे. दुखापतींमुळे काही प्रमुख गोलंदाज बाहेर असल्याने संघाचा समतोल बिघडला आहे. अनेक सामन्यांमध्ये मोठ्या धावसंख्येचा बचाव करण्यात केकेआरला अपयश आले आहे.

दुसरीकडे, मुंबई इंडियन्स या पाच वेळा विजेत्या संघासाठी हा हंगाम अपेक्षेप्रमाणे गेलेला नाही. संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडला आहे. मुंबईच्या खात्यात केवळ आठ गुण आहेत आणि संघ नवव्या स्थानावर आहे. यापूर्वी मुंबई इंडियन्सने केकेआरवर नेहमीच वर्चस्व राखले आहे. दोन्ही संघांमध्ये आतापर्यंत ३६ सामने झाले असून, त्यापैकी २५ सामने मुंबईने जिंकले आहेत, तर केकेआरला फक्त ११ विजय मिळाले आहेत. मात्र सध्या केकेआरचा फॉर्म चांगला आहे.

घरच्या मैदानावर खेळण्याचा फायदा आणि प्लेऑफमध्ये पोहोचण्याची जिद्द यामुळे कोलकाताचा संघ पूर्ण ताकदीने मैदानात उतरेल. दुसरीकडे, मुंबईला गमावण्यासारखे काही उरलेले नसल्याने ते मुक्तपणे खेळू शकतात. त्यामुळे हा सामना अत्यंत रंगतदार आणि चुरशीचा होण्याची शक्यता क्रिकेट चाहत्यांना आहे.

# विनेश प्रकरणी डब्ल्यूएफआयला नोटीस! ६ जुलैला सुनावणी

■ चंदीगड

**विनेश** फोगट यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाने कुस्ती महासंघाला (डब्ल्यूएफआयला) नोटीस बजावली. मात्र, न्यायालयाने विनेश फोगट यांना तातडीचा दिलासा देण्यास नकार दिला असून, या प्रकरणाची पुढील सुनावणी ६ जुलै रोजी होणार आहे. त्यामुळे विनेश आणि भारतीय कुस्ती महासंघ यांच्यातील वाद तीव्र होण्याची शक्यता आहे.

भारतीय कुस्ती महासंघाने विनेश फोगट यांना गैरशिस्तीचे वर्तन आणि उत्तेजकविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

या निर्णयाविरोधात विनेश फोगट यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने कुस्ती महासंघ आणि केंद्र सरकारला नोटीस बजावत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.

# युवा खेळाडूंना स्वातंत्र्य द्या तेंडुलकरचा पालकांना सल्ला

■ अहमदाबाद

**मास्टर** ब्लास्टर सचिन तेंडुलकरने युवा खेळाडू आणि त्यांच्या पालकांना महत्त्वाचा संदेश देताना मुलांवर अनावश्यक ताण टाकू नका, तर त्यांना स्वातंत्र्य आणि योग्य प्रोत्साहन देण्याचा सल्ला दिला. अहमदाबादमधील क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील कार्यक्रमात बोलताना सचिन तेंडुलकरने तरुणांना कोणताही सोपा मार्ग न शोधता जिद्दीने पुढे जाण्यास सांगितले. सचिनने सांगितले की, पालकांशी संवाद साधताना त्याने मुलांना स्वातंत्र्य देण्याचे आवाहन केले. फक्त निकालावर लक्ष देऊ नका. मुलांना शिकू द्या, चुका करू द्या आणि त्यातून पुढे जाऊ द्या, असा सल्ला दिला. अपयश हा यशाचा पाया असतो आणि प्रत्येक फलंदाज बाद होतो, प्रत्येक गोलंदाजाच्या गोलंदाजीवर धावा होतात.

# अफगाणिस्तान मालिका! पंतऐवजी राहुल उपकर्णधार

■ नवी दिल्ली

**अफगाणिस्तानविरुद्धच्या** आगामी कसोटी मालिकेसाठी बीसीसीआयने भारतीय संघाची घोषणा केली. यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतकडून उपकर्णधारपद काढून घेऊन अनुभवी फलंदाज के. एल. राहुलकडे ही जबाबदारी सोपवली आहे. तर शुभमन गिलकडे कर्णधारपदाची जबाबदारी कायम ठेवली आहे.



भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात ६ जूनपासून न्यू चंदीगड येथे एकमेव कसोटी सामना खेळवला जाणार आहे. या मालिकेसाठी निवडलेल्या १५ सदस्यीय संघात युवा आणि अनुभवी खेळाडूंचा समतोल साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यातील खराब कामगिरीनंतर ऋषभ पंतवर टीका वाढली होती. चार डावांत अवघ्या ४९ धावा केल्यानंतर आणि आयपीएलमधील खराब फॉर्ममुळे बीसीसीआयने त्याच्याकडून उपकर्णधारपद काढून घेतले. मात्र, संघातील त्याचे स्थान कायम ठेवण्यात आले आहे. या मालिकेसाठी भारताचा प्रमुख वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा या दोन्ही खेळाडूंना विश्रांती दिली आहे. त्यामुळे मधल्या फळीत आणि फिरकी गोलंदाजीत काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार आहे. संघात तीन नवोदित खेळाडूंना पहिल्यांदाच स्थान मिळाले आहे.

**अफगाणिस्तानविरुद्ध भारताचा कसोटी संघ**

शुभमन गिल (कर्णधार), के. एल. राहुल (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, साई सुदर्शन, ऋषभ पंत, देवदत्त पडिक्कल, नितीश कुमार रेड्डी, वॉशिंग्टन सुंदर, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, गुरनूर ब्रार, हर्ष दुबे, मानव सुथार आदी खेळाडूंचा संघात समावेश केला आहे.

# अडीच वर्षांनंतर नेमारचे ब्राझील संघात पुनरागमन

■ ब्राझिलिया

**फिफा** विश्वचषक स्पर्धेपूर्वी ब्राझील फुटबॉल संघाने सर्वात मोठा डाव खेळत अनुभवी आघाडीपटू नेमारला पुन्हा संघात स्थान दिले. जवळपास अडीच वर्षांनंतर नेमारचे ब्राझीलच्या राष्ट्रीय संघात पुनरागमन झाले आहे.

ब्राझीलचे मुख्य प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी नेमारच्या निवडीचे समर्थन करताना स्पष्ट सांगितले की, तो केवळ राखीव खेळाडू नाही, तर कोणत्याही क्षणी सामन्याचे चित्र बदलण्याची क्षमता असलेला खेळाडू आहे. नेमारचा अनुभव, चेंडूवरील नियंत्रण आणि निर्णायक क्षणी खेळ उंचावण्याची ताकद ब्राझीलसाठी मोठी जमेची बाजू ठरणार आहे. नेमारचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना २०२३ मध्ये उरुग्वेविरुद्धच्या पात्रता फेरीत झाला होता. त्या सामन्यात त्याच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे तो दीर्घकाळ मैदानापासून दूर राहिला होता.

# शिवाजी पार्कवर २२ मेपासून इनडोअर महापौर चषक क्रिकेटचा थरार

■ मुंबई

**मुंबईतील** क्रिकेटप्रेमींसाठी पारंपरिक क्रिकेटसोबतच इनडोअर क्रिकेटचा वेगवान आणि थरारक अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. महामुंबई इनडोअर क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे २२ ते २४ मे २०२६ दरम्यान महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले आहे. दादरमधील शिवाजी पार्क परिसरातील अर्बन स्पोर्ट टर्फवर क्रिकेटचा थरार रंगणार आहे.

इनडोअर क्रिकेटच्या या वेगळ्या आणि जलद फॉरमॅटमुळे प्रत्येक चेंडूवर प्रेक्षकांना रोमांच अनुभवायला मिळणार आहे. २२ मे रोजी सकाळी ८ ते १२ या वेळेत सामने खेळवले जाणार आहेत, तर २३ आणि २४ मे रोजी सायंकाळी ६ नंतर स्पर्धेची रंगत वाढणार आहे.

महापौर चषक इनडोअर क्रिकेट स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे ८ षटकांचा वेगवान आणि रोमांचक फॉरमॅट. प्रत्येक संघात १२ खेळाडू असले तरी मैदानावर एका वेळी ८ खेळाडू खेळणार आहेत. प्रत्येक खेळाडूला एक षटक टाकणे बंधनकारक असल्याने रणनीती आणि चपळाईला महत्त्व असणार आहे. महाराष्ट्रात इनडोअर क्रिकेटची लोकप्रियता झपाट्याने वाढत असून, मुंबईसह जळगाव, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती येथेही राज्यस्तरीय स्पर्धांची तयारी सुरू आहे. क्षितीज वेदक आणि बाळासाहेब तोरस्कर यांच्या पुढाकारामुळे शिवाजी पार्कच्या क्रिकेट संस्कृतीत आता इनडोअर क्रिकेटची नवी भर पडत आहे.

# परिवर्तन चषकात निखिलचे शतक! गावस्कर संघ आघाडीवर

■ मुंबई

मुंबई क्रिकेटमधील उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या एच.डी.एफ.सी. बँक परिवर्तन चषक निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत दुसऱ्या फेरीतील सामन्यांमध्ये युवा खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. ओव्हल मैदानावर झालेल्या सामन्यात निखिल अहिरवालच्या संयमी शतकाच्या जोरावर गावस्कर संघाने तेंडुलकर संघाविरुद्ध पहिल्या डावातील महत्त्वाची आघाडी घेत गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले.

तेंडुलकर संघाच्या २५२ धावांच्या प्रत्युत्तरात गावस्कर संघाने दमदार फलंदाजी करत पहिल्या डावात आघाडी मिळवली. निखिल अहिरवालने २५४ चेंडूंमध्ये संयमी ११६ धावांची नाबाद शतकी खेळी केली, तर अर्विन अंबाती (५३) आणि लॅव्हिश सिंग (३७ चेंडूंमध्ये ५९) यांनी आक्रमक फलंदाजी करत संघाला ९० षटकांत ५ बाद २६६ धावांपर्यंत पोहोचवले. तेंडुलकर संघाकडून अमर बीकेने ३ बळी घेतले. दुसऱ्या सामन्यात वेंगसरकर संघाने शास्त्री संघावर वर्चस्व गाजवले. शास्त्री संघाला पहिल्या डावात ७४ धावांत रोखल्यानंतर वेंगसरकर संघाने अनुज चौधरीच्या ७४ धावांच्या जोरावर २०० धावा केल्या. दुसऱ्या डावात शास्त्री संघाने ८ बाद १५६ धावा केल्या. दिव्यम लोढाने ४, तर देवेन शर्माने ३ बळी घेत वेंगसरकर संघाची पकड मजबूत केली.



# केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजय यांची तत्काळ हकालपट्टी करा

हैदराबाद

**केंद्रीय** गृह राज्य मंत्री बंडी संजय कुमार यांच्या मुलावर दाखल झालेल्या लैंगिक अत्याचार आणि पॉक्सो प्रकरणावरून बीआरएस अर्थात भारत राष्ट्र समितीचे नेते के. टी. रामाराव यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. केटीआर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे बंडी संजय यांची केंद्रीय मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे, जेणेकरून या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होऊ शकेल.

येथील एलबी नगरमध्ये आयोजित केलेल्या 'ना भूत-ना विश्व' कार्यक्रमात केटीआर यांनी ही मागणी केली आहे.यावेळी

**बीआरएसचे नेते केटीआर यांची मागणी**



ते म्हणाले की,एका १७ वर्षीय मुलीवर अन्याय झाल्यावरही राज्य सरकारने ही बाब गांभीर्याने घेतलेली नाही.तब्बल ९ दिवस आरोपी गुन्हा दाखल होऊनही लपून होता. तो कुठे लपला होता आणि त्याला नेमके कुणी संरक्षण दिले ? खरे तर या प्रकरणाचे गांभीर्य कमी करण्याचा प्रयत्न राज्याचे मुख्यमंत्री ए.रेवंत यांनी केला असल्याचा आरोप केटीआर यांनी यावेळी केला.

यामध्ये केवळ बीआरएसनेच पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने लढा दिला, असा दावाही त्यांनी केला.दरम्यान, केंद्रीयमंत्री बंडी संजय यांचे सुपुत्र बंडी साई भगीरथ यांच्यावर एका १७ वर्षीय मुलीच्या छळाचा व लैंगिक अत्याचाराचा आरोप ठेवण्यात आला आहे.

# ऑस्ट्रेलियात शीखविरोधी न्यू नाझी संघटनेवर बंदी

सिडनी

**ऑस्ट्रेलियात** राहणाऱ्या शीख समुदायाला सरकारने मोठा दिलासा दिला. ऑस्ट्रेलियाचे गृहमंत्री टोनी बर्क यांनी शीख समुदायासह सर्व भारतीय लोकांविरुद्ध वर्णद्वेषी टिप्पणी करणाऱ्या आणि रॅली काढून धमकावणाऱ्या न्यू नाझी संघटनेवर बंदी घातली. त्यांनी स्पष्ट केले की, आता या संघटनेत सामील होणाऱ्या, तिचा प्रचार करणाऱ्या किंवा तिच्या कारवायांमध्ये भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला १५ वर्षांपर्यंत तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. ही संघटना काही वर्षांपासून डॉल्फ हिटलरच्या नाझी विचारधारेचा प्रचार करत होती आणि देशात राहणाऱ्या गैर-श्वेत स्थलांतरितांना लक्ष्य करत होती. मेलबर्न आणि सिडनीसारख्या मोठ्या शहरांत या गटाचा नेता थॉमस सेवेल याने स्थलांतरितांविरुद्ध अनेक रॅली काढल्या होत्या. हा गट सोशल मीडिया आणि जमिनीवर सातत्याने ऑस्ट्रेलियात विभाजित करण्याचा आणि अल्पसंख्याकांविरुद्ध हिंसक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करत होता.

देश विदेश

# केनियात वाहतूक चालकांच्या देशव्यापी संपाला हिंसक वळण

नैरोबी

**इंधन** वाढीच्या निषेधार्थ केनियातील सार्वजनिक वाहतूक चालकांनी देशव्यापी संप पुकारला. या संपाला हिंसक वळण लागले आणि आंदोलक वाहतूक चालकांनी रस्ते अडवले असून रस्त्यांवर टायर जाळून आग लावली.

या आंदोलनामुळे नैरोबीकडे जाणारी वाहतूक ठप्प झाल्यामुळे बाजारपेठा बंद ठेवण्यात आल्या होत्या आणि हजारो लोकांना कामावर पायी जावे लागले. शाळांनी विद्यार्थ्यांना घरीच थांबण्यास सांगितले. नैरोबी आणि इतर शहरांमधील काही भागांत पोलिसांनी कारवाई करत आंदोलकांवर अश्रुधूर सोडला. काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. ट्रान्सपोर्ट सेक्टर अलायन्सने (टीएसए) म्हटले आहे की, इंधना वाढीमुळे वाहतूक चालक हैराण झाले आहे. सरकारने लवकरात लवकर इंधनवाढीवर नियंत्रण ठेऊन आम्हाला दिलासा द्यावे. जोपर्यंत इंधनाचे दर कमी होत नाही. तोपर्यंत आम्ही संप मागे घेणार नाही.

# रस्त्यांवर नमाज पढण्यास परवानगी नाही योगी आदित्यनाथ यांची ठाम भूमिका

लखनऊ

**उत्तर** प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी स्पष्ट शब्दांत ठामपणे सांगितले आहे की, उत्तर प्रदेशात रस्त्यांवर नमाज अदा करण्यास परवानगी दिली जाणार नाही. सार्वजनिक रस्ते हे वाहतुकीसाठी आहेत आणि धार्मिक कार्यक्रमांसाठी ते अडवले जाऊ शकत नाहीत.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

बकरीईदच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर केलेल्या या वक्तव्यामुळे सार्वजनिक ठिकाणी सामूहिक नमाजाच्या मुद्द्यावर पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. या विषयावर बोलताना मुख्यमंत्री योगी म्हणाले की, सरकार नमाजाच्या विरोधात नाही. मात्र उपासना निश्चित केलेल्या ठिकाणीच व्हावी आणि त्यामुळे वाहतूक किंवा जनसुविधांना अडथळा निर्माण होता कामा नये. मशिदींमध्ये किंवा नमाजस्थळी मोठी गर्दी होत असल्यास रस्ते अडवण्याऐवजी टप्प्याटप्प्याने नमाज अदा केली जाऊ शकते.उत्तर प्रदेशसारख्या दाट लोकवस्तीच्या राज्यात शिस्त आणि कायद्याचे पालन अत्यावश्यक आहे. प्रशासन सुरुवातीला शांततेने नियमांचे पालन करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करेल. मात्र वारंवार नियमभंग झाल्यास कठोर कारवाई केली जाईल.

# धरणात बुडालेल्या सोमेश्वर मंदिराचा २४ मे रोजी वर्धापनदिन


पणजी

**दक्षिण** गोवा जिल्ह्यातील सांगे तालुक्यातील ऐतिहासिक कुर्डी हे गाव ५० वर्षांपूर्वी धरणात बुडाले होते.हे गाव सध्या सर्वांसाठी खुले झाले आहे. या गावातील प्राचीन व जागृत श्री सोमेश्वर देवस्थानचा वार्षिक वर्धापनदिन येत्या रविवार २४ मे रोजी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे. यानिमित्त दुपारी २ व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. सांगे तालुक्यात १९७० च्या दशकात साळावली धरण बांधताना कुर्डी आणि कुर्पे ही गावे धरणाच्या पाण्यात बुडाली होती. त्यामुळे तेथील रहिवाशांचे इतरत्र पुनर्वसन करण्यात आले.

विशेष म्हणजे वर्षातील अकरा महिने हे कुर्डी गाव पाण्याखालीच असते. मात्र, मे महिन्याच्या सुमारास उन्हाळ्यामुळे धरणाची पाण्याची पातळी खालावते आणि हा संपूर्ण ऐतिहासिक गाव पुन्हा एकदा जमिनीवर अवतरतो.वर्षभर बुडालेला हा गाव फक्त मे महिन्यातच पाहता येतो.

# चीनच्या जमिनीखालून निघाले! क्षेपणास्त्र बनवणारे १७ दुर्मीळ धातू

बिजिंग




**चीनच्या** अत्यंत थंड आणि दुर्गम भागात भूगर्भशास्त्रज्ञांना एका मोठ्या सर्वेक्षणादरम्यान अत्यंत मौल्यवान आणि लष्करी दृष्टीने संवेदनशील असलेल्या १७ दुर्मिळ मृदा खनिजांचा शोध लावण्यात मोठे यश आले. हा शोध अशा वेळी लागला, जेव्हा अमेरिका, रशिया आणि युरोपीय देश हायपरसॉनिक क्षेपणास्त्रे आणि सहाव्या पिढीतील लढाऊ विमाने विकसित करण्यासाठी धडपडत आहेत. या शोधामुळे जागतिक संरक्षण बाजारपेठेतील चीनची मक्तेदारी आता अभेद्य होण्याची चिन्हे आहेत.

चीनच्या ईशान्येकडील 'हेलोंगजिआंग' आणि 'जिलिन' या तीव्र हिवाळा असलेल्या प्रांतांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले. येथील खडक प्रामुख्याने 'अल्कलाइन ग्रॅनाइट' प्रकारातील आहेत. या भागात हिवाळ्यात अतिशय कडक थंडी आणि उन्हाळ्यात तीव्र उष्णता असते. निसर्गाच्या या गोठण्याच्या आणि वितळण्याच्या वारंवार घडणाऱ्या चक्रांमुळे हे कठीण खडक हळूहळू कमकुवत होऊन तुटले. जेव्हा या भागातील बर्फाची मोठी चादर वितळली, तेव्हा शास्त्रज्ञांनी या विखुरलेल्या मातीचे आणि खडकांच्या तुकड्यांचे नमुने तपासले. त्यातूनच या १७ अद्भुत आणि अत्यंत दुर्मिळ घटकांचे रहस्य जगासमोर आले.

# मुंबई-गोवा महामार्गावरील परशुराम घाटात दुसरी लेन सुरू

रत्नागिरी

**मुंबई-गोवा** महामार्गावरील परशुराम घाटातील दुसरी मार्गिका वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून घाट परिसरात डोंगरकटाई, रॉक बोल्टिंग, रिटेनिंग वॉल व गॅबियन वॉलची कामे सुरू होती. ही कामे आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याने प्रशासनाने दुसरी मार्गिका खुली केली. परशुराम घाट हा महामार्गावरील महत्त्वाचा आणि धोकादायक टप्पा मानला जातो. पावसाळ्यात येथे दरडी कोसळण्याच्या घटना घडत असल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

संरक्षक कामे पूर्णत्वाकडे गेल्याने प्रवास अधिक सुरक्षित होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, घाटातील उर्वरित कामेही लवकरच पूर्ण करण्यात येणार असून, संपूर्ण महामार्गाचा दर्जा सुधारण्यावर भर दिला जात आहे.

# डहाणू टेम्पो दुर्घटनेनंतर लाखात पाड्यावर शोककळा

डहाणू

**ट्रक व टेम्पो चालकाला अटक**

**मुंबई** अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर डहाणू येथील धानिवरी येथे झालेल्या टेम्पो अपघातात मयत झालेल्या १३ जणांपैकी १२ जण हे बापूगावातील लाखात पाड्यामधील रहिवाशी होते. अपघातानंतर गावात शोककळा पसरली असून घराघरात आक्रोश ऐकू येत आहे. आज आदिवासी मंत्री आणि पालकमंत्र्यांनी गावात भेट देऊन मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. या अपघात प्रकरणी ट्रक आणि टेम्पोचालकाला कासा पोलिसांनी अटक केली आहे.

काल मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर धानिवरी येथे साखरपुड्यासाठी निघालेल्या टेम्पोला कंटेनरने धडक दिल्याने झालेल्या अपघातात १३ जणांचा मृत्यू झाला होता. सर्व मयत बापूगावातील लाखातपाडा येथील आहेत. या दुर्घटनेनंतर बापूगाव सुन्न झाले असून प्रत्येक घरातून आक्रोश ऐकू येत आहे. काल आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांनी अंत्यविधीच्या ठिकाणी थेट भेट देऊन पीडित कुटुंबांचे सांत्वन केले आणि या सर्व कुटुंबांचे पालकत्व शासन घेणार असल्याचे जाहीर केले. पालकमंत्री गणेश नाईक यांनी मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत घोषित केली असून जखमींना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार देण्याचे निर्देश दिले आहेत.

**दुचाकी स्वार वाचला पत्नी, मुलीचा मृत्यू**

साखरपुड्यासाठी निघालेल्या वऱ्हाडाबरोबर श्रीराम वळवी (३५) आपली पत्नी वंदना आणि मुलगी सलोनीसह निघाला होता. टेम्पोत जागा नसल्याने श्रीरामने आपली दुचाकी काढली. त्याची पत्नी दुचाकीवर मागे बसली होती तर मुलगी टेम्पोमध्ये होती. टेम्पो आणि कंटेनरच्या मध्ये दुचाकी दबली गेली. या अपघातात वळवी वाचला असला तरी दुचाकीवरील पत्नी वंदनाचा जागीच मृत्यू झाला. दुसरीकडे टेम्पोमध्ये असलेली मुलगी सलोनीचाही मृत्यू झाला.

# दिल्लीत रिक्षा-टॅक्सीचालकांचा तीन दिवस संपाचा इशारा

नवी दिल्ली

**दिल्लीतील** रिक्षा-टॅक्सी चालकांच्या संघटनांनी भाडेवाढीच्या मागणीसाठी येत्या २१ मेपासून तीन दिवस संपाचा इशारा दिला आहे. आखाती युध्दामुळे पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे दर वाढत चालले आहेत. त्यामुळे रिक्षा-टॅक्सी चालकांनाही भाडे वाढवून द्यावी,अशी संघटनांची भूमिका आहे. त्यासाठी २१ ते २३ मे असे तीन दिवस दिल्लीत रिक्षा-टॅक्सी चालक कडकडीत बंद पाळणार आहेत. सरकार एक किंवा दोन आठवड्यांच्या अवधीत भाडेवाढीसंबंधीची अधिसूचना जारी करावी. अन्यथा मोठे आंदोलन छेडण्याचा इशारा चालक शक्ती युनियनने दिला आहे.

# अमेरिकेतील सॅन डिएगोतील मशिदीत गोळीबार! ५ ठार

सॅन डिएगो

अमेरिकेतील सॅन डिएगो येथील मशिदीत काल झालेल्या गोळीबारात ५ लोकांचा मृत्यू झाला. यात एक सुरक्षा रक्षक आणि दोन संशयितांचा समावेश आहे.

या हल्ल्यामागील नेमके कळलेले नाही.तो धार्मिक विद्वेषातून झाला असावा, असे पोलिसांचे म्हणणे आहे. दोन्ही संशयित किशोरवयीन होते. एकाचे वय १७ वर्षे आणि दुसऱ्याचे १९ वर्षे होते. दोघांचे मृतदेह मशिदीजवळ एका वाहनात सापडले.

# नालासोपाऱ्यात अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

**८ जणांविरोधात गुन्हा**

नालासोपारा

**नालासोपाऱ्यात** राहणाऱ्या १५ वर्षीय मुलीवर ६ जणांनी मागील ५ महिन्यांपासून सामूहिक बलात्कार केल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. तुळींज पोलिसांनी याप्रकरणी एकूण ८ जणांना अटक केली असून त्यात दोन महिलांचा समावेश आहे,

पीडित मुलगी १५ वर्षांची नालासोपारा पूर्वेला राहते. तिच्याच परिसरात राहणाऱ्या ब्रीजेश राव (३२) सुनिल गौतम (४०) सुभाष कहार (५४) देवेंद्र विश्वकर्मा, रवींद्र विश्वकर्मा, ब्रीजकिशोर शर्मा या ६ जणांनी तिला ५० रुपये ते ५०० रुपयांचे आमिष दाखवले आणि तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. जानेवारी २०२६ पासून हा प्रकार सुरू होता. हा प्रकार उघड होताच तुळींज पोलिसांनी एकूण ८ जणांविरोधात बलात्कार, पोक्सो, तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याअनव्ये अटक केली.

आरोपींना मदत करणाऱ्या दोन महिलांविरोधातही गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यातील ३ आरोपींना अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# औषध विक्रेते संपावर ठाम माघार घेण्यास स्पष्ट नकार

पान १ वरून

आमच्या मागण्यांवर सरकारने स्पष्ट तोडगा काढावा. उद्या संपासाठी आझाद मैदानावर येण्यासाठी आम्ही ठाम आहेत. शासनाकडूनही आम्हाला संप माघारी घेण्यासाठी फोन आला होता. मात्र आम्ही मुख्यमंत्र्यांव्यतिरिक्त इतर कोणाशी चर्चा करणार नाही. संघटनेच्या मते, ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून प्रिस्क्रिप्शन औषधांचा गैरवापर वाढत असून, नशेची औषधे, एमटीपी किट्स आणि सिडेनाफिलसारखी औषधे सहज उपलब्ध होत आहेत. तसेच बनावट औषधांचा धोका, साठवणूक आणि तापमान नियंत्रणाबाबतही गंभीर प्रश्न आहेत. तर मोठ्या कॉर्पोरेट कंपन्या २० ते ५० टक्के सवलत देऊन छोट्या औषध विक्रेत्यांना बाजारातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

# रोहित पवार यांनी मुख्यमंत्री यांची भेट घेतली! कांद्याचे दर, नीट वर चर्चा

मुंबई

**राज्यातील** कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून सरकारने घेतलेला निर्णय अयोग्य आहे. शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता. त्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची मंत्रालयात जाऊन भेट घेतली.

रोहित पवार म्हणाले की, लासलगावला आम्ही आंदोलन केले त्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मागणी आहे की कमीतकमी २४ रुपये प्रती किलो हा कांद्याला दर द्यावा. सरकारने स्वतः २०२३ साली हा दर जाहीर केला होता. हा दर मिळावा अशी मी मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली आहे. नाफेडने ८ ते १० लाख टन कांदा घ्यावा अशीही विनंती केली. देशात नीट परीक्षेचा मुद्दा चांगलाच गाजत आहे, यावर देखील रोहित पवारांनी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केली. ते म्हणाले की नीट परीक्षेच्या संदर्भात सीबीआय कडून कारवाई केली जात असून ती योग्य पद्धतीने केली जात आहे. पण तरीसुद्धा अजून कडक चौकशी करून त्यात जे कोणी जबाबदार असतील त्यांना तुम्ही पकडावे आणि परत एकदा नीट असो किंवा राज्यातील इतर परीक्षात कोणत्याही अडचणीत येऊ नये यासाठी दक्षता घेण्यात यावी.

# होर्डिंगबाबत म्हाडा हतबल! पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिटची अट

मुंबई

**गेल्या** वर्षी पावसाळ्यापूर्वी म्हाडाने जाहिरात कंपन्यांना होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करा व अहवाल सादर करा. अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा दिला होता. यातील किती जाहिरात कंपन्यांनी प्रतिसाद दिला. हा संशोधनाचा विषय आहे.

आता पुन्हा म्हाडाने यंदा पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा फतवा काढला आहे, अशी माहिती मुंबई मंडळातील एका अधिकाऱ्याने दिली.

तीन वर्षांपूर्वी घाटकोपर येथे होर्डिंग्ज कोसळून दुर्घटना झाली होती. यामुळे म्हाडा खळबळून जागी झाली होती. त्यांनी उपनगरातील म्हाडाच्या जमिनीवरील होर्डिंग्जची झाडाझडती घेतली होती.

यामध्ये ६० होर्डिंग्ज आढळून आले होते. यात दोन होर्डिंग्ज तोडक कारवाई करण्यात आली होती. ५८ होर्डिंग्जधारकांनी जाहिरातीसाठी पालिकेची परवानगी घेतली होती. जागा मालक असलेल्या म्हाडाकडून ना हरकत प्रमाण पत्र घेतली नव्हती. याबाबत म्हाडाने धोरणात बदल करत जाहिरात कंपन्यांनी होर्डिंग्जचे थकीत भाडे भरावे व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करून, ना-हरकत प्रमाण पत्र घ्यावे, अशा नोटीस गेल्या वर्षी म्हाडाने काढल्या होत्या. पण जाहिरात कंपन्यांनी किती प्रतिसाद दिला हे गुलदस्त्यात आहे. मात्र ३१ मे पर्यंत होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करून म्हाडाला अहवाल सादर करण्याचा आदेश जाहिरात कंपन्यांना दिले आहेत. काहींना थकीत भाड्याची रक्कम भरण्यास सांगितली आहे.

# कर थकविणाऱ्यांवर पालिकेची कारवाई २ हजार ८६३ मालमत्ता जप्त

विरार

**मालमत्ता** कर थकवणाऱ्या २ हजार ८६३ मालमत्ता पालिकेने जप्त केल्या आहेत. या मालमत्तांचा लिलाव केला जाणार आहे. वसई-विरार महापालिका हद्दीत सुमारे १० लाख १६ हजार मालमत्तांची नोंद आहे. यामध्ये निवासी सदनिका, व्यावसायिक गाळे, उपहारगृहे, औद्योगिक वसाहती तसेच मोठ्या इमारतींचा समावेश आहे. महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी मालमत्ता कर वसुलीचे ८६० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवले होते. मात्र, वर्षअखेरीस केवळ ४०० कोटी रुपयांचीच वसुली होऊ शकली. मोठ्या प्रमाणावर थकबाकी राहिल्याने प्रशासनाने थकबाकीदारांविरोधात मोहीम हाती घेतली होती. संबंधित मालमत्ता धारकांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र तरीही कर न भरणार्यांवर कारवाई सुरू केली. पालिकेने कर थकविणार्या २ हजार ८६३ मालमत्ता जप्त केल्या असून जप्त केलेल्या मालमत्तांचा लिलाव केला जाणार आहे.

# वरेडी कोळीवाडा बंदरावर आग

पेण

**पेण** तालुक्यातील वरेडी कोळीवाडा बंदरावर आज अचानक आग लागली. यात मच्छीमार समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीत अनेक होड्या, बोटींची इंजिने, मासेमारीची जाळी तसेच डोल्या मोठ्या प्रमाणात जळून खाक झाल्या.

आग लागल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. कोळी महिला आणि मच्छीमार बांधवांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत तब्बल दोन तास अथक प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग अधिक पसरू शकली नाही. मात्र या भीषण आगीत मच्छीमारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, आधीच अडचणीत असलेल्या या समाजासाठी हे नुकसान भरून काढणे कठीण बनले आहे. प्रशासनाने तत्काळ पंचनामा करून मदत द्यावी, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

# दर्यापूरमध्ये काँग्रेसला धक्का सुधाकर भारसाकळेंचा राजीनामा

अमरावती

**अमरावती** जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यात काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसचे स्थानिक नेते आणि तालुका अध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षातील अंतर्गत गटबाजी आणि सातत्याने सुरू असलेल्या मतभेदांना कंटाळून भारसाकळे यांनी हा निर्णय घेतल्याची चर्चा आहे.

सुधाकर भारसाकळे हे अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक असून ते भाजपाचे आमदार प्रकाश भारसाकळे यांचे भाऊ आहेत. त्यामुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीकडे लक्ष लागले आहे. ते कोणत्या पक्षात प्रवेश करणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. दरम्यान, नगरपरिषदेच्या निवडणुकीपूर्वीपासूनच दर्यापूर काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद सुरू होते. भारसाकळे यांनी खासदार बळवंत वानखेडे आणि जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्यावर नाराजी व्यक्त करत राजीनामा दिला आहे.

# नांदेड विधान परिषदेची जागा राष्ट्रवादीला सोडा

नांदेड


**चिखलीकरांची मागणी**

**विधान** परिषदेच्या निवडणुकीची घोषणा होताच नांदेड जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग आला आहे. नांदेडमधील स्थानिक स्वराज्य संस्थेची विधान परिषदेची जागा राष्ट्रवादी काँग्रेसला सोडण्यात यावी, अशी मागणी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली आहे. चिखलीकर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री सुनित्रा पवार यांच्याकडे मी मागणी केली आहे की, राष्ट्रवादीला नांदेडची जागा सुटली पाहिजे. पण तिन्ही पक्षांचे नेते एकत्र बसून जागावाटपाबाबत निर्णय घेतील आणि तो निर्णय मान्य असेल. नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचीही चांगली ताकद असून, पक्षाच्या कार्यकर्त्याला संधी मिळावी, यासाठी प्रयत्न करणे माझे कर्तव्य आहे.

# जिल्हा परिषद शाळांमध्ये 'अंगणवाडी' चे वर्ग भरवणार

पुणे

**चालू** शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ पासून राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये अंगणवाडीचे वर्ग भरवले जाणार आहेत. यासाठी शाळांतील सुस्थितीत असलेल्या अतिरिक्त वर्गखोल्या अंगणवाड्यांसाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना शिक्षण विभागाने जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्ध केले आहे.




सध्या राज्यात १ लाख १० हजारांहून अधिक अंगणवाड्या कार्यरत असून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अंगणवाड्यांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या धोरणानुसार पूर्वप्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्याअंतर्गत ३ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी 'आधारशिला बालवाटिका १, २ आणि ३' हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. बहुतांश अंगणवाड्या शाळांपासून स्वतंत्र ठिकाणी असल्याने त्यांना शाळांशी जोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार पूर्वप्राथमिक व प्राथमिक शिक्षणाचा समन्वय साधण्यावर भर दिला जात आहे. नव्या निर्णयानुसार, ज्या जिल्हा परिषद शाळांमध्ये आवश्यक वर्गखोल्यांव्यतिरिक्त सुस्थितीत अतिरिक्त खोली उपलब्ध असेल, ती खोली अंगणवाडीसाठी वापरली जाणार आहे. ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करून त्याचा अहवाल प्राथमिक शिक्षण संचालनालयाला सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# ‘आखरी सवाल’ पाहण्यासाठी चक्क ऑफर

अभिनेते संजय दत्त यांच्या मुख्य भूमिका असलेल्या ‘आखरी सवाल’ या चित्रपटाच्या निर्मात्यांनी प्रेक्षकांसाठी एक विशेष ऑफर जाहीर केली आहे. हा चित्रपट सध्या चित्रपटगृहात यशस्वीपणे सुरू असून, अधिकाधिक प्रेक्षकांनी तो मोठ्या पडद्यावर पाहावा, यासाठी निर्माते निखिल नंदा यांनी ‘एक तिकीट खरेदी



करा आणि दुसरे तिकीट मोफत मिळवा’ (बाय वन गेट वन फ्री) अशी आकर्षक योजना आणली आहे. प्रेक्षक तिकीट बुक करताना एका विशिष्ट कोडचा वापर करून या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. निखिल नंदा यांनी सोशल मीडियावरून या योजनेची माहिती देत, प्रेक्षकांना आपल्या कुटुंबियांसह आणि मित्रांसह चित्रपटगृहात येण्याचे आवाहन केले आहे. ‘एक प्रश्न, एक तिकीट आणि दुप्पट थरार’ अशा शब्दांत त्यांनी या गूढ आणि रहस्यमय चित्रपटाचा आनंद घेण्याचे निमंत्रण दिले आहे.

# ‘तेरा यार हूँ मैं’चे प्रदर्शन लांबणीवर

बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये सध्या चित्रपटांचे प्रदर्शन पुढे ढकलण्यासाठी जणू एक प्रकारची स्पर्धाच सुरू झाली आहे की काय असा प्रश्न पडत आहे. नुकतेच दिग्दर्शक मिलाप मिलन झवेरी यांच्या बहुप्रतिक्षित ‘तेरा यार हूँ मैं’ या चित्रपटाची प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आल्याची घोषणा केली आहे. हा चित्रपट आधी २२ मे २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार होता. मात्र आता त्याच्या नियोजनात बदल करण्यात आला असून, हा चित्रपट ३१ जुलै २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून ज्येष्ठ चित्रपट निर्माते इंद्र कुमार यांचे सुपुत्र अमन इंद्र कुमार




हे मुख्य अभिनेता म्हणून बॉलिवूडमध्ये आपले पदार्पण करत आहेत. त्यांच्यासोबत अभिनेत्री आकांक्षा शर्मा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या नव्या जोडीशिवाय चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते परेश रावल हे देखील एका महत्त्वपूर्ण आणि मध्यवर्ती भूमिकेत पाहायला मिळतील. प्रेक्षकांना मोठ्या संख्येने चित्रपटगृहाकडे आकर्षित करण्यासाठी निर्मात्यांनी प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

# ‘इंडियाज गॉट लॅटंट’चे दुसरे पर्व येणार?

अभिनेत्री आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ यांचे प्रसिद्ध कॉमेडियन समय रैनासोबतचे काही फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. या फोटोंमुळे समय रैनाच्या ‘इंडियाज गॉट लॅटंट’ या लोकप्रिय डिजिटल शोच्या दुसऱ्या पर्वाच्या (सीझन २) पुनरागमनाची जोरदार चर्चा रंगली आहे. मुंबईतील ‘द हॅबिटॅट’ येथे हे शूटिंग पार पडल्याचे समजते. या व्हायरल फोटोंमुळे चाहत्यांमध्ये कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे. आलिया आणि शर्वरी त्यांच्या आगामी ‘अल्फा’ या स्पाय-युनिव्हर्स चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी या शोमध्ये सहभागी झाल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. अद्याप निर्माते किंवा



कलाकारांकडून याबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही, तरीही डिजिटल विश्वात यावर उलटसुलट चर्चा सुरू आहेत.

समय रैनाचा ‘इंडियाज गॉट लॅटंट’ हा शो २०२४ मधील त्याच्या अनोख्या, अनफिल्टर्ड आणि उपरोधिक विनोदी शैलीमुळे प्रचंड लोकप्रिय ठरला होता. मात्र, काही वादग्रस्त भागांमुळे या शोला कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागला होता आणि तो काही काळ बंद पडला होता. नुकतेच समयने त्याच्या एका स्टँड-अप शोमध्ये हा शो लवकरच परतणार असल्याचे संकेत दिले होते. आता या शोच्या दुसऱ्या पर्वामध्ये मुख्य प्रवाहातील बॉलिवूड अभिनेत्रींची एन्ट्री होणार असल्याचे पाहून नेटकऱ्यांमध्ये दोन गट पडले आहेत. एका वर्गाला बॉलिवूड आणि डिजिटल कॉमेडी संस्कृतीचा हा मिलाफ आवडला आहे. मात्र, दुसऱ्या वर्गाच्या मते, चित्रपटांच्या व्यावसायिक प्रसिद्धीमुळे या शोचा मूळचा बिनधास्त आणि अनफिल्टर्ड बाज नाहीसा होऊन त्याला कॉर्पोरेट स्वरूप येण्याची भीती आहे.

# ‘शक्ती शालिनी’ येणार पुढील वर्षी

बॉलिवूडमधील दोन मोठ्या चित्रपटांची बॉक्स ऑफिसवरील टक्कर टाळण्यासाठी निर्मात्यांनी एक म ोठा निर्णय घेतल्याचे वृत्त समोर आले आहे. अनीत पड्डा यांच्या मुख्य भूमिका असलेल्या ‘शक्ती शालिनी’ या चित्रपटाचे प्रदर्शन आता २०२७ पर्यंत पुढे




ढकलले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सुपरस्टार शाहरुख खान यांच्या बहुप्रतिक्षित ‘किंग’ या चित्रपटासोबत होणारा थेट संघर्ष टाळण्यासाठी हा महत्त्वपूर्ण बदल केला जाऊ शकतो. हा चित्रपट आधी २०२६ च्या उत्तरार्धात प्रदर्शित करण्याचे नियोजन होते. मात्र, त्याच सुमारास शाहरुख खान आणि सुहाना खान यांचा मुख्य अभिनय असलेला ‘किंग’ हा चित्रपट देखील मोठ्या पडद्यावर येण्यास सज्ज होत आहे.

‘शक्ती शालिनी’ चित्रपटातून अनीत पड्डा एका दमदार आणि वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, चित्रपटाचे कथानक महिला केंद्रित आणि कौटुंबिक पार्श्वभूमीवर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. हा चित्रपट एका मोठ्या बॅनरअंतर्गत तयार होत असून, त्याच्या प्रदर्शनासाठी योग्य आणि मोकळा कालावधी निवडण्याकडे निर्मात्यांचा कल आहे.

# ‘रामायण’चा नवा विक्रम

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक नोंद होणार आहे. दिग्दर्शक नितेश तिवारी यांच्या महत्त्वाकांक्षी आणि बहुप्रतिक्षित ‘रामायण’ या महाकाय चित्रपटाने निर्मितीच्या स्तरावर एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. जागतिक स्तरावर १० हजारांहून अधिक तंत्रज्ञ आणि पडद्यामागील कलाकारांचा ताफा (क्रू मेंबर्स) एकत्र आणणारा हा भारतातील पहिलाच चित्रपट ठरला आहे.

नमित मल्होत्रा यांच्या ‘प्राईम फोकस स्टुडिओ’, ‘डीएनइजी’ आणि अभिनेता यश यांच्या ‘मॉन्स्टर माइंड क्रिएशन्स’ यांच्या संयुक्त विद्यमाने या चित्रपटाची निर्मिती केली जात आहे. हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रेक्षकांच्या भेटीस येणार असून, भारतीय संस्कृतीतील अजरामर कथा आणि जागतिक दर्जाचे प्रगत तंत्रज्ञान यांचा अद्भूत मिलाफ यामध्ये पाहायला मिळणार आहे.

यासाठी जगभरातून प्रॉडक्शन डिझाईन, व्हिज्युअल इफेक्ट्स, ॲक्शन कोरिओग्राफी आणि वेशभूषा यांसारख्या विविध तांत्रिक विभागांतील तब्बल १०,००० पेक्षा जास्त तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले आहे. भारतीय सिनेमाच्या इतिहासात एवढ्या मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांची फौज यापूर्वी कधीही एकत्र आली नव्हती. या ऐतिहासिक विक्रमामुळे चित्रपटसृष्टीतील जाणकार आणि चाहत्यांच्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत.



# ‘वीर’ अँटी हिरो व्यक्तिरेखेत

अभिनेता वीर पहाडिया याच्या आगामी वाटचालीबद्दल चित्रपटसृष्टीतून एक मोठी बातमी समोर आली आहे. ‘स्काई फोर्स’ या चित्रपटातून चित्रपटसृष्टीत पदार्पण केल्यानंतर, आता वीर एका नव्या ॲक्शन-थ्रिलर चित्रपटात मुख्य भूमिका साकारण्यासाठी सज्ज झाला आहे. या चित्रपटाचे नाव ‘बेनाम’ असे ठेवण्यात आले असून, ज्येष्ठ चित्रपट निर्माते-दिग्दर्शक महेश भट्ट हे या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ता (प्रेझेंटर) म्हणून जोडले गेले आहेत. महेश भट्ट यांच्या नावामुळे या चित्रपटाला मोठी ताकद आणि सर्जनशील पाठबळ मिळणार आहे. ‘बेनाम’ हा चित्रपट एका ॲक्शनपटाच्या चौकटीत राहूनही भावनांचा उत्तम मेळ साधणारा ठरेल, असा अंदाज वर्तवला जात आहे.

यामध्ये प्रेक्षकांना थरारक ॲक्शन दृश्यांसोबतच एक भावनिक कथानक पाहायला मिळणार आहे. ‘वीर’ या चित्रपटात पहिल्यांदाच एका आव्हानात्मक ‘अँटी-हिरो’ भूमिकेत दिसणार आहे. या पात्राच्या माध्यमातून प्रेक्षकांना वीरचा एक अतिशय आक्रमक आणि गडद पैलू पाहायला मिळेल. त्याच्या आजवरच्या प्रतिमेपेक्षा ही भूमिका पूर्णपणे वेगळी



असल्याने, ही व्यक्तिरेखा त्याच्या अभिनय कारकिर्दीला एक नवे वळण देऊ शकते, अशी चर्चा चित्रपट वर्तुळात रंगली आहे.

महेश भट्ट यांचे नाव या प्रकल्पाशी जोडले गेल्यामुळे चित्रपटप्रेमी आणि चित्रपटसृष्टीतील जाणकारांमध्ये या चित्रपटाविषयी कमालीची उत्सुकता निर्माण झाली आहे.

# ‘दर्द से हमदर्द तक’ ट्रस्टच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ मुंबई

**‘दर्द** से हमदर्द तक’ ट्रस्टच्या पुढाकाराने उन्हाळी सुट्टीत विधी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या ‘समर इंटर्नशिप प्रोग्राम’ला चांगला प्रतिसाद लाभला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव पवनकुमार तपडिया यांच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. फौजदारी प्रकरणांत आरोपी आणि पीडित व्यक्तीच्या अधिकारांचा विचार करून निवाडा करणे म्हणजे न्याय आहे, असे प्रतिपादन तपडिया यांनी केले.

‘दर्द से हमदर्द तक ट्रस्ट’, ‘जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (मुंबई) आणि ‘सुप्रा लीगल फाऊंडेशन’ यांच्या संयुक्त विद्यमाने विधी विद्यार्थ्यांसाठी ‘समर इंटर्नशिप प्रोग्राम’चे आयोजन केले आहे. उपक्रमात ७० विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

चर्चगेट येथील ‘बहाई सेंटर’ येथे उपक्रमाचा उद्घाटन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी ‘सुप्रा लीगल फाऊंडेशन’च्या अध्यक्षा ॲड. सुनिता साळसिंगीकर, ॲड. आशि नारायण आणि ‘दर्द से हमदर्द तक’ ट्रस्टचे सचिव ॲड. प्रकाश साळसिंगीकर आदी मान्यवरांनी विधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# बेस्टच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या ग्रॅच्युईटीसाठी पालिकेला साकडे

**बेस्ट समितीच्या बैठकीत घेतला निर्णय**

■ मुंबई

**बेस्ट** उपक्रमातून सेवानिवृत्त झालेल्या हजारो कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी आणि इतर अंतिम देयके प्रलंबित आहेत. ही थकबाकी अदा करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांवरील उपासमारीची वेळ टाळण्यासाठी बेस्ट समितीने मुंबई पालिकेकडे वारंवार निधीची मागणी केली आहे.परंतु ही मागणी पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे बेस्ट समितीने पुन्हा एकदा या ग्रॅच्युईटी रकमेसाठी आणि नवीन बसेस खरेदी कामासाठी निधी मिळावा म्हणून पालिकेकडे पाठपुरावा करण्याचा एका बैठकीत निर्णय घेतला आहे.

यासंदर्भात बेस्ट समिती पुन्हा एकदा पालिकेशी पत्रव्यवहार करणार आहे. बेस्ट समितीची बैठक काल सोमवारी पार पडली. या बैठकीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकित ग्रॅच्युईटी आणि नवीन बसेस खरेदीचा विषय चर्चेला आला होता. यावेळी यासाठी बेस्ट समितीने पुन्हा एकदा पालिकेशी पत्रव्यवहार करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वीही बेस्ट समिती अध्यक्षा व महाव्यवस्थापक यांनी पालिका प्रशासनाकडे प्रस्ताव सादर केला होता. मात्र त्यावेळी सकारात्मक भूमिका न घेतल्याने सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची देणी रखडली आहेत. बेस्ट उपक्रमाच्या सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या थकीत ग्रॅच्युईटी व अंतिम देयकाची रक्कम १५०२ कोटी व परिवहन विभागाची बस संचलनासाठी येणारी तूट २४३९ कोटी अशी एकूण ३ हजार ९४१ कोटींची मागणी बेस्टने मुंबई पालिकेकडे केली होती. तसेच बेस्ट उपक्रमाचे वित्तीय कामकाज सुरळीतपणे चालवण्याकरिता ३ हजार ९४१ कोटी अनुदानाची तातडीने मागणी केली होती.

# स्वा. वर्षा गायकवाडांचे बंधू तुषार गायकवाडांचे निधन



■ मुंबई

**काँग्रेसच्या** खासदार वर्षा गायकवाड यांचे बंधू आणि मुंबई काँग्रेसचे महासचिव तुषार एकनाथ गायकवाड यांचे आज सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनामुळे काँग्रेस पक्षासह राज्याच्या राजकीय वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.

तुषार गायकवाड यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन विक्रोळी येथील निवासस्थानी दुपारी १ ते २ या वेळेत ठेवण्यात आले होते. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, कन्नमवार नगर येथे नागरिक व कार्यकर्त्यांसाठी अंत्यदर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती.

तुषार गायकवाड हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिवंगत एकनाथ गायकवाड यांचे सुपुत्र आहेत. मुंबई काँग्रेसमध्ये महासचिव म्हणून तुषार गायकवाड सक्रियपणे कार्यरत होते. पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने काम केले होते. २०२१ मध्ये कोरोनामुळे वडिलांचे निधन झाल्यानंतर गायकवाड कुटुंबावर हा आणखी एक मोठा आघात आहे.

# दुचाकी विहिरीत कोसळली विवाहितेचा पाण्यात बुडून मृत्यू

■ कोल्हापूर

**दुचाकीवरून** डॉक्टरकडे जात असताना पती-पत्नी दुचाकीसह थेट विहिरीत कोसळले. या दुर्घटनेत ३० वर्षीय महिलेचा बुडून मृत्यू झाला, तर तिचे पती थोडक्यात बचावले. हा भीषण अपघात करवीर तालुक्यातील दर्याचे वडगाव येथे काल रात्री घडला.

या अपघातातील मृत महिलेचे नाव मयुरी विशाल बेनके (३०) असे आहे. मयुरी यांची प्रकृती बरी नसल्याने काल रात्री आठ वाजताच्या सुमारास त्या पती विशाल यांच्यासोबत गावातील डॉक्टरांकडे जाण्यासाठी घरातून निघाल्या होत्या. मयुरी स्वतः दुचाकी चालवत होत्या. घरापासून काही अंतरावर आल्यावर रस्त्यालगतच्या विहिरीजवळ अचानक वाऱ्यामुळे मयुरी यांच्या डोळ्यात कचरा गेला. यामुळे त्यांचा दुचाकीवरील ताबा सुटला आणि क्षणार्धात दोघेही दुचाकीसह विहिरीत कोसळले. अंधार आणि विहिरीची खोली जास्त असल्याने पती विशाल यांनी मयुरी यांना वाचवण्याचा



प्रयत्न केला. मात्र पाण्यात त्यांचा शोध लागला नाही. विशाल यांनी आरडाओरडा करत जवळच्या घरांकडे धाव घेऊन घटनेची माहिती दिली. अपघाताची बातमी समजताच युवक आणि ग्रामस्थांनी तातडीने विहिरीकडे धाव घेतली. रूपेश बेनके व त्यांच्या सहकाऱ्यांनी मयुरी यांचा मृतदेह बाहेर काढला. मयुरी यांच्या पश्चात पती, दोन लहान मुली, सासू-सासरे आणि दीर असा परिवार आहे.

# कणकवलीच्या वारगावमध्ये ड्रोनद्वारे केली घरगणना

■ कणकवली

**तालुक्यातील** वारगाव ग्रामपंचायतीने जनगणना २०२७ अंतर्गत डिजिटल घरगणना अधिक अचूक व पारदर्शक करण्यासाठी ड्रोन सर्वेक्षणाचा अभिनव उपक्रम राबवला. सरपंच नारायण शेटे यांच्या संकल्पनेतून गावातील सीमा, घरे आणि इमारतींचे ड्रोनद्वारे चित्रीकरण करण्यात आले आहे.

ड्रोनचा वापर केल्याने गावातील घरे, बागा आणि इमारती यांची अचूक माहिती गोळा करणे शक्य झाले. गावचे सरपंच नारायण शेटे, ग्रामविकास अधिकारी देवेंद्र नलावडे आणि ड्रोन चालक शुभम देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सर्वे पूर्ण करण्यात आला. आगामी जनगणना प्रक्रियेमध्ये अचूक डेटा संकलनासाठी व भविष्यातील ग्रामविकासाच्या नियोजनासाठी या डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठा फायदा होणार आहे. गावाच्या डिजिटल घरगणनेसाठी राबवण्यात आलेल्या या अभिनव ड्रोन सर्व्हेची झलक पाहण्यासाठी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती.

# थकीत मेंटेनन्स शुल्काची वसुली अनेक वर्षांनंतरही होऊ शकते

**उच्च न्यायालयाचा निकाल**

■ मुंबई

**सहकारी** गृहनिर्माण सोसायट्यांचे थकीत मेंटेनन्स शुल्क हे सतत राहणारे दायित्व आहे. अनेक वर्षांनंतरही मेंटेनन्सच्या शुल्काची कायदेशीर वसुली केली जाऊ शकते, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आणि ठाण्यातील दोन ज्येष्ठ नागरिकांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे मेंटेनन्स शुल्क न भरणाऱ्या सभासदांविरोधात कारवाई करण्याचा सोसायट्यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठाण्यातील रहिवाशी असलेल्या दोघा ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या सोसायटीने सुरू केलेल्या मेंटेनन्स वसुलीच्या कारवाईला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. थकीत मेंटेनन्सची वसुली ‘कालबाह्य’ झाली आहे. आपण ‘महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट्स ॲक्ट’ अंतर्गत अधिकृत नोंदणीकृत फ्लॅट मालक नसल्यामुळे मेंटेनन्स देण्यास बांधिल नाहीत, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांतर्फे करण्यात आला.

याचिकाकर्ते रहिवासी १९९६ पासून नोंदणीकृत न केलेल्या विकास कराराच्या आधारे संबंधित फ्लॅटमध्ये राहत होते. त्यांनी थकीत मेंटेनन्सची रक्कम भरण्यास नकार दिला होता. त्यांच्या याचिकेवर न्या. अमित बोरकर यांनी सविस्तर सुनावणी घेतली आणि निर्णय दिला.

# सर्व रस्त्यांची कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करा! आयुक्तांचे निर्देश

■ मुंबई

**मुंबईतील** सर्व रस्त्यांची कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करावी. ही रस्त्यांची कामे करताना केवळ तुकड्यांमध्ये नव्हे, तर एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत संपूर्ण रस्ता दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावा, असे निर्देश पालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले. या मान्सूनपूर्व आढावा बैठकीत आयुक्त भिडे पुढे म्हणाल्या की, ज्याठिकाणी या हंगामात काँक्रिट रस्त्यांची कामे होणे शक्य नाही, त्याठिकाणी काँक्रिट रस्त्यांप्रमाणेच दर्जेदार मास्टिक रस्ते तयार करण्यात यावेत. हे रस्ते वाहतुकीस सुरक्षित, सुयोग्य आणि एकसमान पातळीचे असावेत. कुठेही उंचसखलपणा राहू नये. आवश्यकतेनुसार मिलिंगची कामे करून रस्त्यांची पातळी संतुलित ठेवावी. शाळा, रुग्णालये आणि संवेदनशील ठिकाणी पूर्वी अस्तित्वात असलेले गतिरोधक पुन्हा स्थापित करावेत. तसेच, वाहतूक सुरक्षितता अधिक प्रभावी करण्यासाठी थर्मो प्लास्टिक मार्किंग, रंबलर स्ट्रिप्स आदी आधुनिक पर्यायांचाही आवश्यकतेनुसार वापर करण्यात यावा.

# ऋषिकेशमध्ये उज्जैनी एक्सप्रेसचे तीन डबे रुळावरून घसरले

**सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही**

■ ऋषिकेश

**योगनगरी** ऋषिकेश रेल्वे स्थानकाच्या यार्डमध्ये उभ्या असलेल्या उज्जैनी एक्स्प्रेसचे तीन डबे काल रात्री अचानक रुळावरून घसरले. या अपघातात एक बोगी पूर्णपणे ट्रॅकच्या बाहेर जाऊन उलटली असून, ती सुमारे २० फूट उंचीवर हवेत लटकलेल्या अवस्थेत दिसत होती. घटनेनंतरचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.



काल रात्री सुमारे ९.२३ वाजता स्टेशन यार्डमध्ये ट्रेनचा ट्रॅक बदलण्याचे काम सुरू होते. त्याच वेळी ट्रेनचे ब्रेक निकामी झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. नियंत्रण सुटल्याने डबे रुळावरून घसरले आणि काही डबे एकमेकांवर आदळून उलटले. सध्या केदारनाथ यात्रेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रवासी या मार्गावरून प्रवास करत असले, तरी सुदैवाने हा अपघात ट्रेन रिकामी असताना घडला. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघाताच्या वेळी ट्रेनमध्ये केवळ लोको पायलट उपस्थित असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे इतर गाड्यांच्या वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नसल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# कराडचा पारा ४० अंशांवर दुपारी सर्व रस्त्यांवर शुकशुकाट


■ कराड

**शहर** आणि परिसरात उष्णतेची लाट तीव्र होत असून, तापमान ४० अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. मे महिन्याच्या मध्यातच तापमानात झपाट्याने झालेली ही वाढ नागरिकांसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस उष्णतेची लाट कायम राहण्याचा इशारा दिल्यामुळे प्रशासन सतर्क झाले असून, नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुपारच्या सुमारास कडक उन्हामुळे कराड शहरासह ग्रामीण भागातील रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. प्रखर उन्हामुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. शेतकरी, कामगार, बांधकाम क्षेत्रातील मजूर यांना या उष्णतेचा मोठा फटका बसत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, कराड उपजिल्हा रुग्णालय व खासगी दवाखान्यांमध्ये उष्माघात व उष्णतेशी संबंधित आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. काही ठिकाणी उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या घटनाही समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नवाकाळ शब्दकोडे–१६११



**आडवे शब्द –**

१. कर्ज ३. प्रसन्न चेहऱ्याचा ७. कापडी तंबू ९. वाचन करणारा ११. पंढरपूरला पायी जाणारा भाविक १२. मिठाई तयार करून विकणारा १४. मख्खी, खुबी १५. अष्टविनायकांपैकी नगर जिल्ह्यातील एक स्थान १६. बायको १७. परिश्रम, दमणूक १९. खोटा आरोप २०. सार्वजनिक वाहतुकीचे मोठे वाहन २३. खग २४. कोणताही बदल नसलेला दिनक्रम २७. भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील समुद्र ३२. घोषणा ३३. किमया, चमत्कार ३४. वस्ती ३८. कमी वेळात ४०. प्रयास ४१. चिलट ४२. सध्याचे युग ४३. यज्ञातील इंधन ४५. खिडकीची काच ४७. जोर, उत्साह ४८. मासलेवाईक ५०. विरस झाल्याने नाराज झालेला ५१. श्रेष्ठ ५२. संघर्ष ५३. फौंटनपेनचे धातूचे टोक ५६. निरुद्देश ५७. दरी ५८. कष्ट ६०. अनुकूल वाटणारे ६१. गृहस्थ, पती ६२. साळुंकी ६३. उन्मत्तपणा, मस्तवालपणा ६४. पिंजरा ६६. भाग्य ६७. भार, ओझे ७१. दुष्ट बेत ७२. आसपासचा भाग ७३. शेगडीतले जळण ७४. नेत्रहीन ७५. पंचाईत ७६. रागीट ७८. जगाची रीत ८१. मर्यादित ८४. नर्तकी ८५. जोखीम, दायित्व ८८. कापसाचे बी ८९. खरे ९०. अब्रूदार, सभ्य ९१. शिसारी ९२. लबाड ९३. हेळसांड ९४. कलेचे दैवत असलेले भगवान शंकरांचे रूप

**उभे शब्द –**

१. 'उठा उठा सकळीक, वाचे स्मरा गजमुख....' (गायिका-लता मंगेशकर) २. भेद, अंतर, तफावत ३. कीर्तनकार ४. युद्धबंदीचा करार ५. तनय ६. दूध पूर्ण आटवून केलेला पदार्थ ८. आद्य कीर्तनकार, श्रेष्ठ विष्णूभक्त ९. दुपारच्या जेवणानंतर थोड्या वेळाची झोप १०. चषक, कप ११. हिस्सेदार १३. मुस्लिमांचा सण १८. गायब २०. बांधलेला २१. पायजमा २२. ग्रंथातील निवडक भाग, उतारा २३. पारतंत्र्य, परावलंबन २५. न वापरलेला, नवीन २६. हिंदीत मोठा २७. गोळीबाराचे साधन २८. विवाह २९. दोन्ही ३०. भारतीय स्त्रियांचे आवडते वस्त्र ३१. आकर्षण ३३. अर्भकाचे केस ३५. तकलादू लाकडी पूल ३६. तृष्णा ३७. शस्त्र, साधन, हत्यार ३९. मराठी लग्नकार्यात रूळलेला बंगाली पक्वान्नाचा प्रकार ४०. प्रमुख, मुख्य ४४. माल ठेवण्याचे कोठार ४५अ. शेंगेतील बिया ४६. जरूरी ४९. नायक, पुढारी (हिं.) ५१. सोशिकता ५३. रात्र, रजनी ५४. जर्दाळूचे बी ५५. दिखाऊ मोठेपणाचे वर्णन करणारी म्हण- 'बडा घर ××× ××' ५६. सारखेपणा ५७. मासिक शुल्क देऊन जेवणाचे स्थान ५८. कोल्हापुरी दागिना, वाद्य ५९. कासवाशी शर्यत हरलेला लंबकर्ण गोजिरवाणा प्राणी ६०. प्रतिबंध ६३. गर्दन ६५. झोपडी ६८. ज्याप्रमाणे ६९. ओठ ७०. आदरयुक्त भय, समाजातील वजन ७३. सूट, जाडजूड संरक्षक भिंत ७४. स्त्री ७७. माघार ७८. पार्वती ७९. मदत ८०. गव्हाचे अगदी बारीक पीठ ८२. फरसाण, पोहे, चिवडा, रस्सा वापरून केलेला तर्रीदार पदार्थ ८३. हिंदीत अनुकंपा, मराठीत एक वन्य पशू ८४. नाच ८५. जपणूक ८६. ज्याला ऐकू येत नाही असा ८७. गर्दी ८९. प्रामाणिक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६१० चे उत्तर**

**आडवे शब्द** : २. धुसफूस ६. बाचाबाची ८. जनावर ११. गुजराण १२. फाके पडणे १४. नाच १५. वई १६. दाहक १८. रंभा २०. नम २२. पट्टी २४. दासी २५. परवा २६. अपलाप २८. प्रतिकार २९. चारा ३०. लस ३२. रासभ ३५. पतित ३६. आदिमाया ३८. संतप्त ३९. अंग ४०. उणे ४१. करवाल ४३. चिलीम ४४. पक्ष ४५. बालगंधर्व ४७. भू ४८. खस ४९. हेका ५०. तसदी ५२. रिता ५३. नवा ५४. वर ५८. पोत ५९. आवली ६०. धमक ६२. द्वाड ६३. खटपट ६५. हावरा ६६. पुलक ६७. कमीज ६९. शत ७०. त्रपा ७२. धाप ७३. बडगा ७४. आरमार ७७. गाभारा ७९. पारावार ८०. साप ८१. पारद ८४. दम ८५. हत्ती ८६. वापर ८८. वासा ९०. गरीब ९२. पुस्ती ९६. रेघ ९८. चळवळ ९९. सन १००. कचाट्यात सापडणे १०२. मेंढी १०४. चतुराई १०५. पळ १०६. गडगडाट

**उभे शब्द** : १. चांगुलपणा २. धुराडे ३. सण ४. सफाईदारपणे ५. उपरा ६. बाणेदार ७. बालक ९. नाना १०. वचन १३. परंपरा १७. हवालदिल १९. भाला २१. मळभ २३. अतिथी २५. परा २७. परात २९. चातक ३१. समा ३३. सप्तपदी ३४. जंगल ३६. आवास ३७. याचिका ३८. संमत ३९. अंबारी ४०. उर्वरित ४२. रखवाली ४६. गंगा ४९. हेर ५१. सभ्य ५३. नवरात्र ५४. वडीलधारा ५५. नमकहराम ५६. गौडबंगाल ५७. भोट ५८. पोट ५९. आव ६१. कमी ६३. खट्टू ६४. पदर ६५. हात ६६अ. कप ६८. जबरदस्ती ६९. शर ७१. पागा ७४. आपत्ती ७५. मागोवा ७६. नीर ७८. भाष्य ८०. साहजिक ८१. पार ८२. दवा ८३. मारीच ८७. पडसाद ८९. सारे ९१. बळकट ९२. पुळचट ९३. सनई ९४. खट्याळ ९५. मंडप ९७. घमेंड ९९. सराव १०१. चाप १०३. ढीग

# पेट्रोल-डिझेलच्या भावात चार दिवसांत पुन्हा वाढ

पान १ वरून

लावण्यावरून वाहनधारकांमध्ये हाणामारीच्या घटनाही घडल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातील ३५ पैकी २० पेट्रोल पंपांवरील डिझेलचा साठा पूर्णपणे संपला आहे. शेतकऱ्यांना पंपांवर कॅन घेऊन तासन्‌तास उभे राहावे लागत आहेत. इंधन टंचाईमुळे हिंगोली-वाशिम महामार्ग आज काहीकाळ रोखण्यात आला होता. धाराशिव शहरातील अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक आणि बॅरिकेड लावून ते बंद करण्यात आले आहेत. बीडच्या केज भागात हेच चित्र आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांगरा येथे डिझेल भरण्याच्या वादातून ग्राहकांमध्ये मोठा वाद झाला आहे. रत्नागिरी येथे सीएनजीसोबतच पेट्रोल आणि डिझेलचाही मोठा तुटवडा जाणवत आहे. पंपाबाहेर किलोमीटरभर लांब रांगा लागल्याने दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला आहे. पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील चारोटी येथील पंपांवर आणि रायगडच्या अंतर्गत भागांत इंधन संपल्याच्या अफवांमुळे पेट्रोल भरण्यासाठी मोठी गर्दी झाली. जळगावच्या चाळीसगाव तालुक्यासह ग्रामीण भागात डिझेल आणि पेट्रोल न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांची मशागतीची कामे ठप्प झाली आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील जवळपास निम्म्या पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे बोर्ड दिसत आहेत. पुणे जिल्हा प्रशासनाने आणि पेट्रोल-डिझेल असोसिएशनने स्पष्ट केले आहे की, इंधनाचा कोणताही तुटवडा नाही. केवळ अफवांमुळे नागरिक गरजेपेक्षा जास्त इंधन साठा करत आहेत. प्रशासनाने आणि पेट्रोलियम कंपन्यांनी नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि गरजेपुरतेच इंधन खरेदी करण्याचे आवाहन केले आहे.

# चवताळलेल्या धोकादायक कुत्र्यांना मारून टाका

पान १ वरून

दरम्यान, न्यायालयाने नोव्हेंबर २०२५ मधील आदेश कायम ठेवत सार्वजनिक ठिकाणांवरील भटक्या कुत्र्यांना हटवण्याचा निर्णय बदलण्यास नकार दिला. रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, बस स्थानके आणि रेल्वे स्थानके यांसारख्या ठिकाणांहून भटके कुत्रे हटवण्याचे निर्देश कायम ठेवण्यात आले आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले की, सार्वजनिक सुरक्षितता आणि नागरिकांचे संरक्षण हे सरकारचे कर्तव्य आहे. माणसाचा जीव महत्त्वाचा आहे. या मुद्यावर कोणतीही शिथिलता देता येणार नाही. भाजपाच्या केंद्रिय नेत्या मनेका गांधी यांनी कुत्र्यांना हात लावायचा नाही असा निर्णय दिल्यापासून रस्त्यावरील कुत्र्यांचा हैदोस सुरू आहे. चवताळून चावणाऱ्या कुत्र्यालाही काही करायचे नाही. या नियमांमुळे कुत्र्यांना आवर घालणे अशक्य झाले होते. रात्री उशिरा किंवा सकाळी लवकर कामावर जाताना चाकरमान्यांवर कुत्रे हल्ला करीत होते, लहान मुलांना पकडून कुत्र्याने फरफटत नेल्याच्या घटना अलिकडे अनेक घडल्या. शेवटी न्यायालयाने याची स्वतः दखल घेतली आणि सामान्यांना मोठा दिलासा दिला.

**TENDER NOTICE**

**CLARION VASANT MARVEL CHSL**
**(Regn. No. MUM/WR N/HSG/ TC/16088/2022-23/2022)**
Off Western Express Hwy, Nr Magathane Metro Station, Borivali (E), Mumbai - 66.
Email: hd.clariontower@gmail.com
Sealed quotations are invited from reputed & experienced

**SECURITY AGENCIES**

for our CHS comprising 4 wings of 15 storeys each, 236 flats, with Access Control (Matrix) system & No Broker Hood visitor management.
Agencies must hold valid license under Private Security Agencies Regulation Act (PSARA) for Maharashtra, with proven track record, references & experience in similar sites.Agency must comply with all statutory requirements incl. Minimum Wages, PF, ESIC & applicable labour laws.Interested firms may submit sealed tenders in two parts (Technical & Financial) along with Tender Fee **Rs. 1000/- (Non-refundable)** by cheque/digital payment in favour of Society. Society reserves right to accept/ reject any or all tenders without assigning reason.
**Last date for submission 13.06.2026**
**Call Society Manager on 9867521095**
**Sd/-**
**Clarion Vasant Marvel CHSL**

**'वसुली अधिकारी' यांचे कार्यालय**
द्वारा:- **प्रभात को- ऑप क्रेडिट सोसायटी लिमिटेड**
पत्ता :- ३७/२६४७, अभ्युदय नगर, ग. द. आंबेकर मार्ग, काळाचौकी, मुंबई- ४०००३३, फोन न., ९३२२८२१२४५.

**फॉर्म झेड**
(नियम १०७ चा उपनियम (११ डी-१) पहा)

ज्या अर्थी निम्न स्वाक्षरीकार प्रभात को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे' वसुली अधिकारी या नात्याने महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज नियम १९६१ अन्वये दिनांक **२१.०९.२०२२** रोजीची मागणी नोटीस व जप्तीपूर्वक मागणी नोटीस अधिपत्राद्वारे दिनांक ०४.११.२०२२ रोजी सूचना निर्गमित केली असून न्यायनिर्णित ऋणकोंना म्हणजेच कर्जदार आणि जामीनदार. **श्री. सुरेश धोंडू पाताडे व सौ स्वप्नाली सुरेश पाताडे** व इतर न्यायनिर्णित ऋणको श्री सागर शांताराम पुजारी, श्री किशोर वामन सुरलकर आणि श्री चंद्रसेन राजाराम गमरे यांनी सूचनेत नमूद केलेली रक्कम **रुपये १९,९८,१६९ (रुपये अक्षरी एकोणीस लाख अठ्ठयानव हजार एकशे एकोणसत्तर मात्र)** येणे दिनांक **०४.११.२०२२** रोजी वसुली पर्यंत व त्यावर पुढील येणे व्याज रकमेची परतफेड होईपर्यंत सदर सुचनेच्या प्राप्तीच्या तारखेला करण्यास सांगितले होते आणि सदर न्यायनिर्णित ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरल्याने निम्न स्वाक्षरीकारांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीची जप्ती व सदर जप्तीकरता सूचना निर्गमित केली आहे. सदर रकमेची परतफेड करण्यास न्यायनिर्णित ऋणको असमर्थ ठरल्याने आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की निम्न स्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा ताबा त्यांना महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज नियम १९६१ च्या नियम १०७ (११-डी-१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून दिनांक **१४/०५/२०२६** रोजी घेतला आहे.

विशेषता: न्यायनिर्णित ऋणको आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **प्रभात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड**, अभ्युदय नगर, काळाचौकी च्या रक्कम **रुपये १९,९८,१६९ (अक्षरी रुपये एकोणीस लाख अठ्ठयानव हजार एकशे एकोणसत्तर मात्र)** येणे दिनांक **२१.०९.२०२२** रोजी वसुली पर्यंत व त्यावरील पुढील येणे व्याज राहील.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

**अ)** निवास- त्रिमूर्ती कॉलनी, मटन मार्केटच्या मागे, मराठा सेक्शन ३२, प्रभाग क्रमांक ४१, ठाणे क्रमांक १४३८, उल्हासनगर- (पूर्व), जिल्हा- ठाणे ४२१००४.
**ब)** दुकान - यू.एम. सी. मिळकत क्रमांक, 41CI020131500, मराठा सेक्शन ३२, बरैक क्रमांक-१४२३/१, खाट क्रमांक ११४, स्टेशन रोड, उल्हासनगर (पूर्व), जिल्हा-ठाणे ४२१००४.

**दिनांक: १४/०५/२०२६**
**स्थळ : मुंबई.**
शिक्का
**हरिदास गोरडे**
**वसुली अधिकारी**
(म.स. संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये)

# नीट-पीजी पेपरफुटी प्रकरणात मोटेगावकरच्या मुलाची चौकशी

पान १ वरून

३ मे रोजी होणाऱ्या मुख्य परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि उत्तरे २३ एप्रिल रोजीच मोटेगावकरच्या मोबाईलवर आली होती, असा सीबीआयचा दावा आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीमध्ये पेपर सेटर असलेला मास्टरमाईंड प्रा. पी. व्ही. कुलकर्णी यानेच ही प्रश्नपत्रिका मोटेगावकरला दिल्याची माहिती आहे. मुलासाठी प्रश्नपत्रिका मिळवल्यानंतर मोटेगावकरने लातूर परिसरातील इतर श्रीमंत विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क साधून लाखो रुपये उकळल्याचाही सीबीआयला संशय आहे. सीबीआयला मोटेगावकर याच्या बँक खात्यात काही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून पैशाचे व्यवहार झाल्याचे आढळले आहे. सीबीआयने तीन विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचीही चौकशी सुरू केली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात शिवराज मोटेगावकर याच्या विरोधात राज्यभर आंदोलनेही सुरू आहेत. लातूरमध्ये मनसे कार्यकर्त्यांनी आरसीसी क्लासवर अंडी फेकत घोषणाबाजी केली. यावेळी पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएम आणि भाजपा युवा मोर्चाने निषेध आंदोलन केले. कोल्हापुरात शिवसेना आणि युवा सेनेकडूनही आंदोलन करत मोटेगावकरच्या पोस्टरला काळे फासण्यात आले. दरम्यान, काँग्रेसचे प्रवक्ते आलोक शर्मा आणि प्रिया शर्मा यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करत एनटीएऐवजी स्वतंत्र यंत्रणेकडून परीक्षा घेण्याची आणि विद्यार्थ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

# पार्थ नंतर तटकरे, मुंडे, भुजबळ फडणवीसांना भेटले! राष्ट्रवादी फुटणार?

पान १ वरून

आहे. २६ फेब्रुवारी रोजी मुंबईतील वरळी येथे पार पडलेल्या पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. त्यानंतर सुनेत्रा पवार यांनी पक्षाची नवीन कार्यकारिणी निवडणूक आयोगाला पाठवली. यात पक्षाच्या १४ पदाधिकाऱ्यांची नावे होती. या यादीत सुनेत्रा पवार यांचा राष्ट्रीय अध्यक्ष तर शिवाजीराव गर्जे यांचा खजिनदार असा उल्लेख करण्यात आला होता. मात्र सुनील तटकरे यांच्या नावासमोर लोकसभेतील नेते तर प्रफुल्ल पटेलांच्या नावासमोर फक्त राज्यसभेतील नेते असा उल्लेख करण्यात आला होता. तटकरे हे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आहेत. तर पटेल हे कार्याध्यक्ष आहेत. मात्र त्यांच्या नावांसमोर या पदांचा उल्लेख सुनेत्रा पवार यांनी टाळला. त्याचवेळी पार्थ पवार यांना राष्ट्रीय सरचिटणीस तर जय पवार यांना राष्ट्रीय सचिवपदी नेमले. जय पवार यांच्याकडे पक्षाच्या शिस्तपालन समितीचे अध्यक्षपदही दिले. वास्तविक २६ फेब्रुवारी रोजी जेव्हा सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली, त्याचवेळी तटकरे यांची प्रदेशाध्यक्षपदी तर पटेल यांची राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आली होती. असे असताना सुनेत्रा पवार यांनी पत्रात त्यांच्या पदांचा उल्लेख टाळल्यामुळे राजकीय वर्तुळात तो चर्चेचा विषय ठरला. याबद्दल सुनेत्रा पवार यांनी तांत्रिक चुकीमुळे हा घोळ झाला अशी सारवासारव केली होती. मात्र एकूण तटकरे आणि पटेल यांचा पक्षात सर्वकाही आलबेल नाही, असे स्पष्ट दिसते. त्यानंतर जय पवार यांना पक्षाचे खजिनदार करण्यात आले. एका बाजूला या घडामोडी घडत असतानाच पक्षाचे रणनीतीकार म्हणून डिझाईन बॉक्सच्या नरेश अरोरांच्या जागी प्रशांत किशोर यांच्या आयपॅक कंपनीला नेमण्याचा निर्णय सुनेत्रा पवार यांनी घेतला. सुनेत्रा पवार यांची प्रशांत किशोर यांच्यासोबत दोन तास बैठक झाली. या बैठकीला फक्त पार्थ पवार हजर होते. तटकरे, पटेल या महत्त्वाच्या बैठकीलाही नव्हते. १ जूनपासून प्रशांत किशोर राष्ट्रवादी काँग्रेसचे नवे रणनीतीकार म्हणून काम सुरू करतील.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the public at large that I, Mr. Subhashchand Gupta, intend to create a charge by way of Mortgage in respect of the property more particularly described hereunder, on the basis of the following laminated original title documents relating to the said property:
Possession Letter Cum Possession Receipt issued by MHADA in the name of Mr. Damodar Ramchandra Gharat.
Allotment Letter issued by MHADA in the name of Mr. Damodar Ramchandra Gharat.
Provisional Offer Letter issued by MHADA in the name of Mr. Damodar Ramchandra Gharat.
Transfer Order issued by MHADA in the name of Mr. Nitin Madhukar Purav.
**Schedule of Property**
Flat No. 1508/4C, New Hind Mills MHADA, Ghodepdeo, Mumbai – 400033.
I intend to create the said charge/ mortgage for availing a loan facility from SBI Bank, Branch Code – 17889, Home Loan Centre, Chinchpokli.
Any person, bank, financial institution, organization or party having any right, title, interest, claim, demand, objection, lien, charge, encumbrance or dispute of whatsoever nature in respect of the said property shall intimate the same in writing along with documentary proof to the undersigned as well as to the above-mentioned branch of State Bank of India within 15 days from the date of publication of this notice, failing which such claim, if any, shall be deemed to have been waived and/or abandoned, and the mortgage transaction shall be completed without reference to any such claim.
**Mr. Subhashchand Gupta**
**Mobile No.: 9022444886**
**Place: Mumbai**

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेस **सूचना** देण्यात येते की, माझे अशिल भारतीय भागीदारी कायदा, १९३२ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या मे. शाम्बवी एंटरप्रायझेस या भागीदारी संस्थेकडून, 'साई ज्योती' नावाच्या नवीन इमारतीतील ३ऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ३२, मोजमाप सुमारे ७५० चौ. फूट रेरा कार्पेट क्षेत्र, ७ वा रोड, खार पश्चिम, मुंबई – ४०००५२ येथे स्थित, तसेच पिट-पझल यांत्रिक पार्किंग प्रणालीतील १ (एक) कार पार्किंग जागेसह खरेदी करण्यासाठी वाटाघाटी करीत आहेत.

कोणा/सर्व व्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्थांना खाली नमूद केलेल्या फ्लॅटच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, ताबा, वारसा, पारेषण, धारणाधिकार, सुखसोयी, मृत्युपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्याचा दावा असल्यास त्यांनी याद्वारे ते लेखी स्वरूपात, दाव्याच्या समर्थनार्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह, **वकिल श्री.दिपेश जे. सांचला, कार्यालय क्र.ए-०२, तळ मजला, आलोक अपार्टमेंट कोहौसोलि, महंत रोड एक्सटेंशन, विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथे यांच्या कार्यालयात, हे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शिर्षक, फायदे आणि/किंवा हितसंबंध, पुढील कोणत्याही सूचना न देता माफ केले गेले आहेत आणि/किंवा सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

**मालमत्तेची अनुसूची**

सर्व ती फ्लॅट क्र. ३२, मोजमाप सुमारे ७५० चौ.फू रेरा कार्पेट क्षेत्र, 'साई ज्योती' नावाच्या नवीन इमारतीच्या ३ऱ्या मजल्यावर स्थित, ७ वा रोड, खार पश्चिम, मुंबई – ४०००५२ येथे असलेली, तसेच पिट-पझल यांत्रिक पार्किंग प्रणालीतील १ (एक) कार पार्किंग जागेसह, आणि सदर इमारत गाव बांद्रा ई, तालुका अंधेरी येथील प्लॉट क्र. १११ वर बांधकामित, त्यास अनुरूप सीटीएस क्र.ई/६४२ किंवा त्याच्या आसपास असलेली जमीन, मुंबई उपनगर नोंदणी जिल्हा व उपजिल्हा यांच्या हद्दीत स्थित आहे.

दिनांक: २०.०५.२०२६
सही/-
**(श्री.दिपेश जे. सांचला)**
वकिल

# वांद्र्याच्या गरीबनगर झोपडपट्टीवर बुलडोझर

पान १ वरून

अतिक्रमणामध्ये अंदाजे ४०० ते ५०० झोपड्या, दुकाने तसेच काही बहुमजली झोपड्यांचा समावेश आहे. यापैकी सुमारे १०० झोपड्या अधिकृत असल्याने त्यांना वगळण्यात येणार असून उर्वरित बांधकामांवर बुलडोझर चालवण्यात येत आहे. या कारवाईला आज सकाळपासून सहा बुलडोझरच्या सहाय्याने कारवाईला सुरुवात करण्यात आली. मात्र या कारवाईला स्थानिक नागरिकांनी तीव्र विरोध केला आहे. 'आम्हाला कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नाही. घरांच्या बदल्यात घर द्यावे', अशी मागणी रहिवाशांनी केली. अनेक कुटुंबांनी भीतीपोटी घरे रिकामी करण्यास सुरुवात केली. कारवाईदरम्यान परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आरपीएफ, जीआरपी आणि मुंबई पोलीस मिळून हजारांहून अधिक सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. तसेच अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन यंत्रणाही सज्ज होत्या. कारवाईवेळी भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी बेकायदेशीर बांधकामांवर टीका करत 'लँड जिहाद चालणार नाही' असा इशारा दिला. या कारवाईचा फटका रेल्वे प्रवाशांनाही बसला आहे. वांद्रे स्थानकावरील पूर्वेकडील फूटओव्हर ब्रिज सुरक्षेच्या कारणास्तव २३ मेपर्यंत बंद ठेवण्यात आला आहे. मात्र, याबाबत पुरेशी पूर्वसूचना न दिल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून, अनेकांना पर्यायी मार्ग शोधावे लागत आहेत.

**जाहीर सूचना**

जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, मी खाली लिहिलेल्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या स्पष्ट आणि विक्रीयोग्य शीर्षक आणि सर्व बोज्यांपासून मुक्त मालमत्तेकरिता, जी आमचे अशील मालकाकडून खरेदी करण्यास इच्छुक आहेत (**"प्रस्तावित व्यवहार"**), **श्री. हयात अहमद आसिर अहमद अन्सारी,** मुंबई, भारतीय निवासी, पॅन: एबीएमपीए२२५०आर आणि आधार कार्ड क्र. ८७४१ ११९६ ४५०६, त्यांचा पत्ता - सदनिका क्र. १९०२, १९ वा मजला, पिरामल अरण्या, टॉवर अव्यान, ई.एस. पाटणवाला मार्ग, माझगाव, भायखळा (पूर्व), मुंबई - ४०००१० (**"मालक"**) यांच्या शीर्षकाची तपासणी करीत आहे.

कोणा व्यक्तीचा सदर जागा किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या आणि/किंवा प्रस्तावित व्यवहाराच्या संदर्भात विक्री, विक्रीकरिता करारपत्र, वाटप, हस्तांतरण, अभिहस्तांकन, देवाणघेवाण, गहाणवट (मूळ शीर्षक करारनाम्याची ठेव आणि/किंवा अन्यथा मार्गाद्वारे समाविष्ट), धारणाधिकार, प्रभार, भेट, वारसा, ताबा, भोगवटा, भाडेकरू, पोट-भाडेकरू, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, काळजीवाहू आधारे, देखभाल, विभागणी, मुखत्यार पत्र, इच्छापत्र, मृत्युपत्र, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, वहिवाट, संपादन, मागणी, कोणत्याही न्यासाअंतर्गत कोणताही बोजा किंवा लाभार्थी हक्क/हितसंबंध, वहिवाटीचा किंवा पूर्व-खरेदीचा अधिकार किंवा कोणत्याही करारपत्र किंवा इतर रचनेअंतर्गत किंवा कोणत्याही खटल्याअंतर्गत, प्रलंबित कायदेशीर कारवाईद्वारे, कोणत्याही न्यायालय किंवा प्राधिकरणाद्वारे दावा, हुकूम, मनाई आदेश, आदेश किंवा जप्ती किंवा निवाडा या मार्गे किंवा अन्यथा कशाही प्रकारे कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध (**"दावा"**) असल्यास, त्यांना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत येथील दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत निम्नस्वाक्षरीकार यांना सदनिका क्र. ५०२, ५ वा मजला, ए विंग, कॉसमॉस नेस्ट, ढाकोळी नाका, कोलशेत रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०७ येथे सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांच्या प्रतिंसह लेखी स्वरुपात सूचित करावे, असे न केल्यास, असे समजण्यात येईल की, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही किंवा असे कोणतेही दावे किंवा आक्षेप, जर असल्यास, सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल आणि प्रस्तावित व्यवहार त्याच्या संदर्भाशिवाय पूर्ण करण्यात येईल.

**वरील उल्लेखित मालमत्तेची अनुसूची**
(**"सदर जागा"**)

माझगाव विभागाचा कॅडस्ट्रल सर्व्हे क्र. ५२३(भाग) धारण केलेल्या जमिनीवर बांधलेल्या, बॅरिस्टर पै नाथ मार्ग, रे रोड, माझगाव, मुंबई - ४०००१० येथे स्थित **"ईझी मंझिल"** या इमारतीच्या तळमजल्यावरील सर्व दुकाने व त्यासह शिव शंकर को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० च्या तरतुदींअंतर्गत नोंदणीकृत, नोंदणी क्र. एमयूएम/एसआरए/एचएसजी/(टीसी) ११३८५/२००७ धारण केलेली गृहनिर्माण संस्था द्वारे पारित समभाग, ज्याचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:

(i) दुकान क्र. १, मोजमाप २४० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ५४ दिनांक ५ ऑक्टोबर, २००७ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. १८६ ते १९० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णत: भरणा केलेले समभाग.
(ii) दुकान क्र. २, मोजमाप २८० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ५५ दिनांक ५ ऑक्टोबर, २००७ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. १९१ ते १९५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णत: भरणा केलेले समभाग.
(iii) दुकान क्र. ३, मोजमाप २८० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ५६ दिनांक ५ ऑक्टोबर, २००७ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. १९६ ते २०० (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णत: भरणा केलेले समभाग.
(iv) पोटमाळ्यासह दुकान क्र. ४, मोजमाप २८० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ४३ दिनांक ५ ऑक्टोबर, २००७ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. २०१ ते २०५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णत: भरणा केलेले समभाग.
(v) पोटमाळ्यासह दुकान क्र. ५, मोजमाप २५४ चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ व त्यासह भाग प्रमाणपत्र क्र. ३७ दिनांक ५ ऑक्टोबर, २००७ नुसार डिस्टिंक्टिव्ह क्र. १८१ ते १८५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रु. ५०/- प्रत्येकीचे ५ (पाच) पूर्णत: भरणा केलेले समभाग.

**दिनांक: २० मे, २०२६**
**सही/-**
**युसूफ ए इंवोरवाला**
**ॲडव्होकेट, मुंबई उच्च न्यायालय**



# ब्रेड पाच रुपयांनी महागला

**मुंबई** - दुधाच्या दरात प्रति लीटर २ रुपयांची वाढ १४ मे रोजी झाल्यानंतर आता ब्रेडच्या दरातही प्रति पॅक ५ रुपयांनी वाढ केली आहे. यामुळे वडा पाव, पाव भाजी आदि पदार्थ महाग होणार आहेत. एकूणच वाढत्या महागाईमुळे सामान्यांचे कंबरडे मोडले आहे. जवळजवळ सर्वच ब्रँडचे ब्रेड महाग होणार आहेत. यामुळे ग्राहक घटणार आहेत. पण नाईलाजानेच ब्रेडची किंमत वाढवावी लागली आहे.

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याला विरोध! अष्टविनायक मंदिरे एकवटली

**महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता आणि कोट्यवधी हिंदूंचे श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायक देवस्थानांच्या शेकडो एकर जमिनीला धोका पोहोचवणारा 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' कोणत्याही अटीशिवाय राज्य सरकारने तत्काळ मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी आज येथे आयोजित अष्टविनायक मंदिरांच्या विश्वस्तांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली. महसूल व वन विभागाने पुढे सरकवलेला हा मसुदा म्हणजे हिंदू मंदिरांची स्वायत्तता आणि त्यांच्या उत्पन्नाचे ऐतिहासिक स्रोत मुळापासून मोडीत काढण्याचे पद्धतशीर कारस्थान आहे. एका बाजूला अल्पसंख्याकांच्या संस्थांना कायदेशीर अभेद्य कवच द्यायचे आणि दुसऱ्या बाजूला हिंदूंच्या पवित्र मंदिरांची मालमत्ता व्यक्तींच्या खासगी घशात घालायची, हा सरकारी दुजाभाव अष्टविनायक मंदिरे कदापि सहन करणार नाही, सर्व अष्टविनायक मंदिरांचा या प्रस्तावित कायद्याला तीव्र विरोध आहे, अशी स्पष्ट भूमिका 'चिंचवड देवस्थान ट्रस्ट'चे विश्वस्त श्री. केशव विद्वांस यांनी अष्टविनायक मंदिरांच्या संयुक्त पत्रकार परिषदेद्वारे मांडली.**

■ पुणे

**पुणे** येथे झालेल्या पत्रकार परिषदेला अष्टविनायक मंदिरे समितीच्या वतीने श्री मयुरेश्वर (मोरगांव), श्री चिंतामणी (थेऊर), श्री सिद्धिविनायक (सिद्धटेक),



श्री मोरया गोसावी संजीवन समाधी मंदिर आदीचे व्यवस्थापन पाहणारे चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस, श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे, उपाध्यक्ष श्री. वैभव आपटे, श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट ओझरचे अध्यक्ष श्री. बाळकृष्ण कवडे, श्री गणपती देवस्थान महडचे विश्वस्त श्री. किरण काशीकर आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट हे उपस्थित होते. राज्यातील सर्वच देवस्थानांना ग्रासणाऱ्या या संभाव्य संकटामुळे आता महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि जमिनींची एकमेव मालक आहे. परंतु या प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे एका झटक्यात ही ऐतिहासिक इनामे रद्द होऊन, देवतेच्या जमिनी वहिवाटदार, मिरासदार किंवा पुजारी यांच्या नावे खासगी मालमत्ता म्हणून वर्ग केल्या जातील.

परिणामी ज्या जमिनी पिढ्यान्‌पिढ्या केवळ बाप्पाच्या धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी वापरल्या गेल्या, त्यांचे व्यापारीकरण होऊन तिथे व्यावसायिक मॉल किंवा हॉटेल्स उभी राहतील आणि भूमाफियांच्या टोळ्या मंदिरांची भूमी गिळंकृत करतील. उत्पन्नाचे मूळ साधनच नष्ट झाल्यामुळे ही स्वाभिमानी देवस्थाने भविष्यात शासकीय अनुदानावर परावलंबी आणि हतबल होतील, अशी गंभीर आणि रास्त भीती निर्माण झाली आहे.

किंवा जिल्हाधिकारी) दिलेल्या कोणत्याही मनमानी निर्णयाविरोधात भाविकांना किंवा देवस्थान विश्वस्तांना दिवाणी न्यायालयात (Civil Court) दाद मागता येणार नाही, अशी लोकशाहीविरोधी तरतूद करण्यात आली आहे. न्यायालयाचे दरवाजे बंद करून सरकार प्रशासकीय दडपशाही लादू पाहत आहे. त्याहून धक्कादायक बाब म्हणजे, देवस्थानच्या जमिनींवरील अवैध अतिक्रमणे हटवण्याऐवजी १ जानेवारी २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांना थेट मालकी हक्क बहाल करणे म्हणजे देवस्थानच्या पवित्र मालमत्तेची कायदेशीर लूट करण्यासारखेच आहे.

यावेळी समस्त मंदिरांच्या वतीने सरकारकडे मागण्या करताना मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट म्हणाले की, प्रथम हिंदू देवस्थानांचे अस्तित्व धोक्यात आणणारा हा जुलमी मसुदा सरकारने कोणत्याही अटीशिवाय त्वरित व कायमचा रद्द करावा. सर्वसामान्य भाविक, ग्रामस्थ आणि दुर्गम भागातील मंदिरांपर्यंत हा विषय पोहोचण्यासाठी हरकती नोंदवण्याची मुदत किमान दोन महिन्यांनी वाढवून मिळावी. गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही कठोर 'जमीन बळकाव प्रतिबंधक कायदा' लागू करून देवस्थानच्या जमिनींना विशेष कायदेशीर




धार्मिक वैभव असलेली पवित्र अष्टविनायक मंदिरेही या विरोधात पुढे आली असून, त्यांनी या कायद्याला कडाडून विरोध दर्शवला आहे.

चिंचवड देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्री. केशव विद्वांस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, पेशवे आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मोरगाव, सिद्धटेक, पाली, महाड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव या अष्टविनायकांच्या मंदिरांमध्ये त्रिकाळ पूजा-अर्चा, महाप्रसाद, अखंड अन्नछत्र, नैवेद्य आणि वार्षिक उत्सव अविरत चालण्यासाठी शेकडो एकर जमिनी 'इनाम' म्हणून दिल्या आहेत. कायदेशीर नियमांनुसार मंदिराची 'मूर्ती' हीच एक 'कायदेशीर व्यक्ती' (Juristic Person) असून, या

श्री बल्लाळेश्वर देवस्थान (पाली) ट्रस्टचे श्री. जितेंद्र गद्रे म्हणाले की, या मसुद्यातील कलम १ (उपकलम २) अत्यंत पक्षपाती आणि निषेधार्ह आहे, ज्याद्वारे वक्फ बोर्डाच्या अखत्यारितील जमिनींना या कायद्यातून पूर्णपणे वगळून विशेष संरक्षण देण्यात आले आहे. केवळ हिंदू मंदिरांच्या जमिनींचे 'निर्मूलन' करणे आणि इतर धर्मीयांच्या संस्थांना पाठीशी घालणे, हा प्रकार संविधानाच्या कलम १४ मधील 'समानतेच्या अधिकाराचा' उल्लंघन आहे. धर्मनिरपेक्षतेचे धोरण राबवणाऱ्या राज्यात बहुसंख्य हिंदू समाजाला आणि त्यांच्या मंदिरांना अशी दुय्यम वागणूक देणे अत्यंत संतापजनक आहे.

या कायद्यातील कलम १८ नुसार, महसूल अधिकाऱ्यांनी (तहसीलदार

संरक्षण देण्यात यावे. देवस्थानच्या जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतरण किंवा विक्री कायमची थांबवण्यासाठी ७/१२ उताऱ्यावर 'अहस्तांतरणीय' आणि 'देवस्थान जमीन: प्रतिबंधित सत्ता प्रकार' अशी ठळक आणि कायदेशीर नोंद बंधनकारक करावी.

मंदिरांची भूमी ही केवळ जमीन नसून तो हिंदू संस्कृतीचा आणि आस्थेचा पवित्र वारसा आहे. सरकारने जर हिंदू समाजाच्या भावना पायदळी तुडवून हा कायदा रेटण्याचा प्रयत्न केला, तर धार्मिक संस्था, संप्रदाय, समस्त मंदिर विश्वस्त, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि कोट्यवधी गणेशभक्तांना सोबत घेऊन संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा मंदिर महासंघाच्या वतीने श्री. घनवट यांनी दिला.

# दिल्ली हायकोर्टाने उमर खालिदचा अंतरीम जामीन अर्ज फेटाळला

■ नवी दिल्ली

२०२० **च्या** दिल्ली दंगली प्रकरणातील आरोपी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचा माजी विद्यार्थी उमर खालिद याचा अंतरिम जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळला.

आपल्या काकांच्या मृत्यूनंतर ४०व्या दिवशी करायचा धार्मिक विधीला (छेहलम) हजर राहण्यासाठी खालिदने १५ दिवसांच्या अंतरिम जामिनासाठी अर्ज केला होता. या अर्जावर आज अतिरिक्त सत्र न्यायाधीशांसमोर वाजपेयी सुनावणी झाली. त्याप्रसंगी खालिदच्या वकिलांनी सांगितले की, खालिदचे वडील ७१ वर्षांचे आहेत. त्याला पाच बहिणी आहेत. खालिदचे वडील पत्नीची काळजी घेण्यास असमर्थ आहेत. त्यावर न्या. वाजपेयी म्हणाले की, यापूर्वी खालिदसह खटल्यातील सहआरोपींनाही वेळोवेळी अंतरिम जामीन दिला आहे. त्या सर्वांनी जामिनाच्या अटींचे कधीही उल्लंघन केले नाही. मात्र प्रत्येक वेळी जामिनाची मागणी न्यायालयाला मान्य करता येत नाही.

# टीव्हीके सरकार कोसळणार? तयार राहा!

■ चेन्नई

**तामिळनाडूतील** टीव्हीकेचे नवनियुक्त सरकार कोणत्याही क्षणी कोसळणार, असे भाकित माजी मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केले असून, पुन्हा निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आदेश द्रमुकच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.

तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत सुपरस्टार विजय यांच्या टीव्हीके पक्षाने सर्वाधिक १०७ जागा जिंकल्यानंतर काँग्रेससह पाच पक्षांच्या पाठिंब्यावर त्यांनी सरकार स्थापन केले आहे. मुख्यमंत्री बनलेल्या विजय यांना अण्णा

## स्टॅलिन यांचा दावा



द्रमुकमधून फुटलेल्या २५ आमदारांचादेखील पाठिंबा आहे. मात्र, स्टॅलिन यांचा असा होरा आहे की, टीव्हीके सरकारला पाठिंबा देणाऱ्या सीपीआय, सीपीएम आणि व्हीसीके या पक्षांनी पाठिंबा काढून घेतल्यास किंवा विधानसभा अध्यक्षांनी एआयएडीएमकेच्या २५ आमदारांना अपात्र घोषित केल्यास टीव्हीकेचे सरकार कोसळू शकते. त्यामुळे त्यांनी आपल्या द्रमुक पक्षाला पुन्हा निवडणुकीला तयार राहण्यास सांगितले आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# छ.संभाजीनगर जिल्हा बँक निवडणुकीत आ. सत्तारांच्या मुलांची नावे वगळली

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती संभाजीनगर** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आमदार अब्दुल सत्तार यांच्या दहा वर्षांच्या वर्चस्वाला मोठा धक्का बसला आहे. या निवडणुकीसाठी त्यांची दोन्ही मुले समीर सत्तार आणि आमेर सत्तार यांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.

सहकार कायद्यातील नव्या नियमानुसार सलग दहा वर्षे संचालक राहिलेल्या व्यक्तींना पुन्हा निवडणूक लढवता येत नाही. या नियमाचा फटका सत्तार यांच्यासह काही इतर नेत्यांवरही झाला आहे. जिल्हा बँकेवर प्रभाव राखलेल्या सत्तारांचा यावेळी आपल्या मुलांना बँकेच्या राजकारणात आणण्याचा प्रयत्न होता.



मात्र, त्यांच्या नावांवर घेतलेले आक्षेप ग्राह्य धरल्याने हा प्रयत्न अपयशी ठरला आहे. सत्तार समर्थक आणि विद्यमान अध्यक्ष अर्जुन गाढे यांच्यासह काही जणांची नावेही यादीतून वगळण्यात आली आहेत. तर मंत्री अतुल सावे, आमदार संजना जाधव आणि भाजपाचे शहराध्यक्ष किशोर शितोळे यांच्यावरील आक्षेप फेटाळण्यात आले आहेत.

प्रारूप मतदार यादीवर एकूण ४७ आक्षेप दाखल झाले होते. त्यापैकी २२ आक्षेप मान्य करून संबंधित नावे वगळण्यात आली, तर २५ आक्षेप फेटाळण्यात आले.

# राहुल नार्वेकरांचा प्रस्ताव बेस्ट समितीकडून नामंजूर

■ मुंबई

**गेट** वे ऑफ इंडिया परिसरातील बेस्ट बसथांबा स्थलांतरित करण्याबाबत विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर यांनी सुचवलेला प्रस्ताव बेस्ट समितीकडून नामंजूर करण्यात आला आहे. बैठकीत या प्रस्तावाला जोरदार विरोध झाल्यानंतर तो प्रशासनाकडे परत पाठवण्यात आला.

गेट वे ऑफ इंडिया परिसरातील बेस्ट बसचा मार्ग बदलून बसथांबा छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयासमोर हलवण्याची सूचना नार्वेकर यांनी केली होती. त्यांच्या सूचनेनुसार हा प्रस्ताव समितीसमोर मांडण्यात आला होता. मात्र, हा प्रस्ताव सार्वजनिक वाहतुकीऐवजी खासगी वाहने आणि टॅक्सीचालकांना प्राधान्य देणारा असून, सामान्य प्रवाशांच्या हिताविरोधात असल्याची भूमिका सदस्यांनी मांडली. त्यामुळे प्रस्ताव नामंजूर करण्याची मागणी करण्यात आली.

# एसआरटी वैद्यकीय महाविद्यालयाच्या भूलतज्ज्ञ विभागप्रमुखांचा बुडून मृत्यू

■ बीड

**बीडच्या** अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ (एसआरटी) वैद्यकीय महाविद्यालयाच्या भूलतज्ज्ञ विभागाचे प्रमुख डॉ. अभिमन्यू तरकसे यांचा आज सकाळी तलावात बुडून मृत्यू झाला. अत्यंत मनमिळाऊ आणि हुशार तज्ज्ञ डॉक्टरांच्या अकाली जाण्याने अंबाजोगाई शहरातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



डॉ. तरकसे हे अंबाजोगाईजवळील धावडी गावचे रहिवासी होते. ते नेहमीप्रमाणे सकाळी अंबाजोगाईजवळील काष्टी (काळवीट) साठवण तलावात पोहण्यासाठी गेले होते. ते नेहमीप्रमाणे एकटेच पोहण्यासाठी पाण्यात उतरले होते. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी कमरेला प्लॅस्टिकची रिकामी बाटली बांधली होती. आज सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास तलावातील सांडव्याजवळ एक मृतदेह तरंगताना स्थानिकांना दिसला. तो डॉ. तरकसे यांचा असल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतला. पोहताना हृदयविकाराचा झटका आला की अन्य काही कारण होते, याचा तपास सुरू आहे.

# स्पाईस जेटला १४४ कोटी जमा करण्यास मुदतवाढ नाही

■ नवी दिल्ली

१४४ **कोटी** रुपये जमा करण्यासाठी मुदत वाढवून देण्याची स्पाईस जेटची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून

## सुप्रीम कोर्टाचा दणका

लावत त्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

हा वाद माध्यम सम्राट कलानिधी मारन आणि काल एअरवेज यांच्याबरोबर सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याशी संबंधित आहे. आज न्या.पी. एस. नरसिंह आणि न्या. आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी झाली. त्याप्रसंगी स्पाईस जेटच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकूल रोहतगी यांनी युक्तिवाद केला. मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळे कंपनीच्या व्यवसायावर मोठा परिणाम झाला असून, प्रचंड आर्थिक नुकसान सोसावे लागत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या भवितव्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून १४४ कोटी रुपये जमा करण्यासाठी तीन महिन्यांची मुदतवाढ द्यावी, अशी विनंती रोहतगी यांनी केली. मात्र खंडपीठाने ती अमान्य करून स्पाईसजेटला दिल्ली उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

# प.बंगालमध्ये भाजपा सरकारने रस्त्यावरील पट्ट्यांचे रंग बदलले

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमध्ये पहिल्यांदाच सत्तेवर आलेल्या भाजपा सरकारने ममता बॅनर्जी यांच्या खुणा पुसण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून रस्त्यावर रंगवण्यात येणाऱ्या मार्गदर्शक पट्ट्यांचा रंग बदलण्यात आला आहे. हे पट्टे आता निळ्या-पांढऱ्या रंगाऐवजी पिवळ्या-पांढऱ्या रंगात रंगवण्यात येत आहेत.

पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांचे सरकार असताना रस्त्यावरील पट्ट्यांसाठी लाल-पांढऱ्या रंगाचा वापर केला जात असे. ममता बॅनर्जी यांच्या काळात रस्त्यांवरील पट्टे निळ्या-पांढऱ्या रंगाने रंगवले जात होते. उड्डाणपूल, पूल, कठडे, वाहतूक नाके, दुभाजक, उद्याने, सरकारी इमारती आणि अगदी काही ट्रामसुद्धा या आताच्या प्रतिष्ठित रंगसंगतीने रंगवण्यात आल्या होत्या. ही रंगसंगती पश्चिम बंगाल विशेषतः कोलकाताची ओळख बनली होती. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी स्वतःही अनेकदा



निळा काठ असलेली पांढरी साडी नेसत.

भाजपा सरकारने सत्तेवर येताच निळा-पांढरा रंग बदलून पिवळा-पांढरा रंग या पट्ट्यांसाठी निवडला आहे. एका आठवड्यापासून कामगार रस्ते आणि सार्वजनिक वास्तू नव्या रंगांनी रंगवताना दिसत आहेत.

# भाजपाला मतदान करणारे आता कर्माची फळे भोगतील

■ मुंबई

## संजय राऊत यांची बोचरी टीका

**पेट्रोल** आणि डिझेलच्या दरात पाच दिवसांत दुसऱ्यांदा दरवाढ झाल्यावरून शिवसेना उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी भाजपावर बोचरी टीका केली. 'जय श्रीराम' म्हणत भाजपाला मतदान करणारे आता आपल्या कर्माची फळे भोगत आहेत, असे राऊत म्हणाले.

आसाम आणि पश्चिम बंगालमधील निवडणुका संपल्यावर सर्वसामान्यांवर पेट्रोल-डिझेल दरवाढीचा आर्थिक भार टाकून मोदी परदेश दौऱ्यावर निघून गेले. भाजपाच्या नेत्यांना सर्वसामान्यांची कधीच फिकीर वाटली नाही. त्यांच्या भुलथापांना बळी पडून माथ्यावर भगवे टिळे लावून भाजपाला भरभरून मतदान करणाऱ्यांना आता आपल्या पापाची फळे भोगावी लागत आहेत. भाजपाला निवडून दिल्यामुळे आता जनतेला गरीब व्हावे लागेल आणि मोजक्या उद्योगपतींचे हित जपले जाईल, असे राऊत म्हणाले.

# विधान परिषदेच्या आचारसंहितेमुळे कर्जमाफी निर्णय लांबणीवर?

**मुंबई**- राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची मानली जाणारी कर्जमाफी योजना आणखी काही काळ लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. तोपर्यंत शेतकऱ्यांना आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे. विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यामुळे सरकार मोठे आर्थिक निर्णय घेण्याबाबत सावध भूमिका घेत आहे. महायुती सरकारने निवडणुकीदरम्यान कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० जूनपर्यंत निर्णय होईल, असे संकेत दिले होते. सहकार मंत्रालयाने यासंदर्भात प्राथमिक प्रस्तावही तयार केला होता. मात्र, सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असल्याने मंत्रिमंडळात हा प्रस्ताव मांडण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. प्रस्तावानुसार ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीककर्जावर दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचा विचार आहे. याचा फायदा सुमारे ३५ ते ४० लाख शेतकऱ्यांना होऊ शकतो.

# साताऱच्या सरकारी गोदामातील 'माथाडी'ना ४ महिने पगार नाही

■ सातारा

**सातारा** जिल्ह्यातील विविध शासकीय गोदामांमध्ये काम करत असलेल्या माथाडी कामगारांना गेल्या ४ महिन्यांपासून पगारच मिळालेला नाही. त्यामुळे या कामगारांच्या कुटुंबाची उपासमार सुरू असल्याने कामगार संघटना अत्यंत आक्रमक झाल्या आहेत.

सातारा जिल्ह्यातील शासकीय गोदामात काम करणारे कामगारांना महिन्याला साधारण २० हजार रुपये वेतन मिळते. परंतु गेल्या जानेवारीपासून म्हणजे सलग चार महिने या कामगारांना त्यांच्या कष्टाचा वेतन मोबदला मिळालेला नाही. खरे तर माथाडी अधिनियम १९६९ मधील तरतुदीनुसार नोंदीत मालकाने कामगारांची मजुरी व लेव्ही प्रत्येक महिन्याच्या सात तारखेच्या आत माथाडी मंडळाकडे जमा करणे बंधनकारक असते

मात्र शासकीय गोदामातील माथाडी कामगार त्यांच्या वेतनापासून वंचित राहिले आहेत.त्यामुळे सरकारने तत्काळ याची दखल घेऊन त्यांचे संपूर्ण वेतन चुकते करावे,अन्यथा राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, असा इशारा संघटनांनी दिला आहे.



## काम बंद ठेवल्यास ते बेकायदेशीर ठरेल

जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी मात्र या माथाडी कामगार संघटनेला पत्राद्वारे काम बंद ठेवल्यास ते बेकायदेशीर ठरेल असा इशारा दिला आहे.या पत्रात म्हटले आहे की, माथाडी कामगारांकडून करण्यात येत असलेले धान्याच्या पोत्यांच्या चढ-उताराचे काम अत्यावश्यक सेवेत येते. या कामगारांनी काम बंद केल्यास तालुका, जिल्हा पातळीवरील धान्य पुरवठा विस्कळीत होऊ शकतो.या पार्श्वभूमीवर, या कामगारांनी आंदोलन करू नये, काम बंद केल्यास ते बेकायदेशीर ठरेल.